महेंद्र पेढावाला
रजवाडी गुजराती थाळी
पार्सल सुविधा उपलब्ध..
रेल्वे पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय
स्पेशल आमरस 400/- किलो
कापड बाजार, अहिल्यानगर.




# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन / पावभाजी / पंजाबी डिशेस / छोले भटूरे / पावभाजी / मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. २८.०४.२०२६ | अंक नं. ०२४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090



22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
- शेवटचे काही दिवस -
प्रतिग्रॅम ₹888/-* मजुरी
संधीचा आजच फायदा घ्या.
पुन्हा अशी संधी नाही.
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

वाचवा! वाचवा! वाचवा!
केस गळण्यापासून वाचवा, टाईल्स, नळ, आपल्या बिल्डिंगचे आरोग्य तसेच स्वतःचे आरोग्य खराब होण्यापासून
खाऱ्या पाण्याला सर्वोत्तम पर्याय
इलेक्ट्रोमॅग्नेटिक वॉटर कंडिशनर
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES CORPORATION & HARDWARE



हॉस्पिटल स्टाफ पाहिजेत
स्टाफ नर्स : ०२ (ANM/GNM)
मदतनीस : ०२ महिला / पुरुष
वॉर्ड बॉय : ०२
अर्जासह समक्ष भेटावे.
विश्वमंगल आयुर्वेद चिकित्सा केंद्र
ओ-४/५, पहिला मजला, आदर्श समृद्धी, चौपाटी कारंजा, अहिल्यानगर.
फ्लेक्स प्रिंटींग 9403232323

## वाहतुकीला अडथळा होतो म्हणून हॉकर्स उठवायचे आणि तेथे पे अ‍ॅण्ड पार्क करायचे : महापालिकेचा अजब कारभार

### शहरातील अतिक्रमणे हटविण्याबाबत मागणी असतानाही ठोस कारवाई नाही, ठेकेदार धार्जिण्या धोरणावर संघटनांचा संताप

नगर – शहरातील कापड बाजार, मोची गल्ली, शहाजी रोड परिसरातील वाहतुकीला अडथळा ठरतो म्हणून हॉकर्सला तेथून स्थलांतरित करण्याचे धोरण महापालिकेने घेतले असून, या परिसरातील रस्ते मोकळे झाल्यानंतर तेथेच पुन्हा पे अ‍ॅण्ड पार्क करण्याचा प्रस्ताव महापालिकेने तयार केला आहे. विशेष म्हणजे हे पे अ‍ॅण्ड पार्क आणि नो हॉकर्स झोनचे टेंडर देखील महापालिकेने काढले आहे. त्यावरुन नगरकरांमध्ये संताप व्यक्त होत आहे. एकीकडे शहरातील वाहतुकीला अडथळे निर्माण होतात म्हणून छोट्या व्यापाऱ्यांना रस्त्यांवरुन उठवायचे आणि हे रस्ते वसुलीसाठी ठेकेदाराच्या घशात घालायचे, असे धोरण महापालिकेने हाती घेतले आहे, अशी टीका नगरकरांमधून होत आहे.

एकीकडे शहरातील अतिक्रमणे हटविण्यासाठी व्यापाऱ्यांना थेट मंत्र्यांपर्यंत जावे लागते. तरीही महापालिकेकडून ती अतिक्रमणे हटविली जात नाहीत. या अतिक्रमणांमुळे सराफ बाजारात चालायलाही जागा उरली नाही, अशी अवस्था आहे. तेथील अतिक्रमण महापालिका हटवित नाही. गेल्या अनेक वर्षांपासून या परिसरातील अतिक्रमण हटविण्यात यावे, अशी मागणी व्यापारी संघटना करीत आहेत. मात्र, तरीही महापालिका त्यांच्या मागणीची दखल घेत नाही. मात्र, जे हॉकर्स महापालिकेला नियमित कर भरतात, त्या हॉकर्सला हटवून हे रस्ते पे अ‍ॅण्ड पार्क करुन ठेकेदाराला बहाल करण्यासाठी महापालिकेने थेट टेंडर काढले असल्याचे सांगत व्यापाऱ्यांसह नागरिकांमधूनही प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे. हॉकर्स युनिटी असोसिएशनकडून महापालिकेच्या नो हॉकर्स झोन आणि पे अ‍ॅण्ड पार्कला तीव्र विरोध करण्यात येत आहे. याशिवाय शहरातील अनेक व्यापाऱ्यांनी महापालिकेच्या प्रस्तावावर आक्षेप घेतला आहे. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर यांच्यासमोर शहरातील व्यापाऱ्यांनी

(पुढील मजकूर पान २ वर)

## ॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



### स्व. अ‍ॅड. सिताराम बाबुराव साबळे

माजी जिल्हा विशेष लेखापरीक्षक (वर्ग १) सहकार खाते
सहकार विभागातील शासकीय अधिकारी
जन्म दि. ०४/०८/१९४३ । स्व. दि. २१/०४/२०२६

सावली आम्हाला दिली वटवृक्षाप्रमाणे, शिकवण आम्हाला दिली अविरत सेवेची..
कर्तव्य आम्हाला शिकवले स्वकष्टाचे, आदर्श आम्हाला दिले सद्‌विचारांचे..
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली

### ॥ दशक्रिया विधी ॥

गुरुवार दिनांक ३०/०४/२०२६ रोजी,
सकाळी ८.३० वाजता.
स्थळ : अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर येथे होईल.

※ शोकाकूल ※
कैलास सीताराम साबळे (मुलगा) । महेश सीताराम साबळे (मुलगा)
मारुती धोंडीभाऊ रासकर (जावई) । सविता मारुती रासकर (मुलगी)

**समस्त साबळे व रासकर परिवार**
आगरकर मळा, स्टेशन रोड, अहिल्यानगर

## ॥ पंचम पुण्यस्मरण ॥



संथाराव्रतधारी
**स्व. श्रीमती सूरजबाई ख़ुशालचंदजी डागा**
स्वर्गवास : 28 एप्रिल 2021

पता नही क्या जादु होता है माँ के पैरो में
हम जितना झुकते है उतना ऊपर उठ जाते है।

सच में हर रिश्ते में मिलावट देखी,
कच्चे रंगो की सजावट देखी
सालो साल देखा है माँ को ,
उसके चेहरे पर ना थकावट देखी
न ममता में कोई मिलावट देखी।

परमात्मा परमेश्वर आपकी आत्माको परम शांति प्रदान करे ।

**पंचम पुण्यस्मरण पर भावभीनी श्रद्धांजलि।**

प्रविणकुमार, संजय - सौ. ममता, दिनेश - सौ. कविता
एवं समस्त डागा परिवार : अहिल्यानगर - पुणे
अभिजीत - अंजली चोरबेले, पुणे : सौ. मीना - दिनेशजी मुनोत, संभाजी नगर
सौ. अविना - प्रितेशजी कटारिया, पुणे

सूरज इन्फो प्रा. लि. : ॲड मेथडस इंडिया प्रा. लि.
असेन्ट कॉन्ट रिसर्च प्रा. लि. : डागा ग्रोथ सोल्युशन्स : ऑरेंज कॉन्ट रिसर्च LLP

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# खा. लंके लोकसभा ऐवजी विधानसभा लढणार पण हा यु-टर्न 'का' कशासाठी?



दक्षिण नगरचे खासदार निलेश लंके यांनी २०२९ ची लोकसभा ऐवजी पारनेर विधानसभा निवडणूक लढणार असा अगंतुक संकल्प घोषित केला त्यांना ही राजकीय उपरती का आणि कशामुळे झाली हे अद्याप गुलदस्त्यातच आहे पण त्यांनी जाहीररित्या भाष्य करून यु-टर्न जाहीर केला त्यांच्या या यू-टर्नला अनेक राजकीय कंगोरे असू शकतात परंतु त्यांनी हे घोषित करण्यास हाच मुहूर्त का निवडला कदाचित त्यातच त्यांची कारणमीमांसा दडलेली असू शकते त्यांनी जि.प. आणि पंचायत समितीच्या आगामी निवडणुकीची पूर्वतयारीसाठी कार्यकर्त्यांची बैठक बोलावली. त्यात पारनेर विधानसभा निवडणूक लढवण्याचा संकल्प व्यक्त केला. यावरून कार्यकर्त्यांचे राजकीय मनोबल वाढवण्याची खेळी दिसते. दिल्लीत जाऊन स्थानिक प्रश्न सोडवणे अवघड आणि राजकीयदृष्ट्या अडचणीचे ठरते. तेव्हा आमदार म्हणून थेट कार्यकर्त्यांमध्ये सक्रिय राहण्याचा हेतू असू शकतो हा त्यांचा युक्तिवाद ग्राह्य धरता येईल पण हे त्यांच्या पातळीवर घोषित करणे म्हणजे पक्षप्रमुखांच्या अधिकाराला आव्हान देण्याचा प्रकार ठरतो. पक्ष ठरवतो तुम्ही कोणती निवडणूक लढवायची खासदार लंके परस्पर लोकसभाऐवजी विधानसभा लढणार असे असे जाहीर करू शकत नाही तो पक्षशिस्तीचा भंग ठरू शकतो. यापेक्षा पुढे जाऊन त्यांनी लोकसभा उमेदवारी मिळवताना किती तळ्यात मळ्यात केले होते त्या घडामोडी कोणाच्या विस्मरणातून गेलेल्या नाहीत त्यांनी त्या बदल्यात पत्नी सौ. राणी लंके यांना पारनेर विधानसभेसाठी उमेदवारी आणली. पण त्या पराभूत झाल्या. मग आता खा. लंके विधानसभेच्या आगामी निवडणुकीत यशस्वी होऊन पुन्हा आमदार होतील याची शाश्वती काय? नगर जिल्ह्याच्या इतिहासावर दृष्टीक्षेप टाकला तर एकही खासदार पुन्हा आमदार झाला नाही मात्र दादा पाटील शेळके, तुकाराम गडाख, आदारकीनंतर खासदारकीसाठी विजयी झाले होते. त्याला अपवाद यशवंतराव गडाख आहेत पण ते खासदारकीनंतर विधानसभेचे नव्हे तर विधान परिषदेचे आमदार झाले होते त्यामागे त्यांची कोर्टाच्या माध्यमातून ज्या पद्धतीने खासदारकी गेली त्यामुळे राजकीय पुनर्वसनासाठी त्यांना पक्षाने विधान परिषदेची आमदारकी बहाल केली होती

## गडाख फॉर्मुला वेगळा

नगर जिल्ह्यातील गडाख फॉर्म्युला वेगळा होता. त्यांनी पक्षाच्या आग्रही आदेशामुळे लोकसभा लढवली त्यात ते विजयी झाले पण कोर्टात त्यांना खासदारकी गमवावी लागली. परंतु त्यांनी कधीच आपला राजकीय तोल ढळू दिला नाही. खा. लंके आज जिरवा-जिरवीसाठी लोकसभा लढवली असा जो डांगोरा पिटत आहेत ती भाषा गडाख यांनी कधीच वापरली नव्हती. त्यांनी अत्यंत संयमाने राजकीय परिस्थिती हाताळली पण खा. लंके जिरवा-जिरवीची भाषा करून खासदारकी लढणार नसल्याचे सांगत जे आकांड-तांडव करत आहेत अशा उथळ राजकीय संस्कृतीची सवय या जिल्ह्याला नाही. गडाखांप्रमाणे बाळासाहेब विखे यांनी विजयानंतर राजकीय पथ्य पाळली होती. विखे-गडाखांच्या निवडणुकीपासून राजकीय बोध घेण्याऐवजी खा.लंके ज्या पद्धतीने बोलत आहेत ते व्यक्ती केंद्रीत दिसते. त्याचे समर्थन होऊ शकत नाही. खा.लंके यांचे हे मोठे राजकीय अपयश, त्यांनी स्वतःच अधोरेखित केले. ज्यांना लोकसभेच्या माध्यमातून प्रश्न सोडवता येत नाही. ते सत्ता नसताना विधानसभेच्या द्वारे विकास कसा करता येईल मग पारनेरच्या जनतेने त्यांना पुन्हा आमदार का करायचे असे एक ना अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होऊ शकतात.

## आमदारकीचे गाजर का ?

खा. लंके लोकसभा ऐवजी विधानसभा लढण्याचा संकल्प स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पार्श्वभूमीवर व्यक्त करतात, याचा अन्वयार्थ कार्यकर्त्यांचे मनोबल वाढवण्याचा हेतू लपून राहत नाही हे जसे एक कारण असू शकते. दुसरे दिल्लीच्या राजकारणातून त्यांना कदाचित गोपनीय माहिती मिळालेली असू शकते की सुजय विखे भाजप उमेदवारी देणार नाही. परिणामी आगामी निवडणूक लढणे राजकीयदृष्ट्या अवघड होऊ शकते. त्यात लोकसभा निवडणूक काळात लंके यांनी जी आश्वासने दिली ती अपूर्णच आहेत. लोकसभा मतदारसंघातील त्यांचा वावर आणि संपर्क कमी झाला त्या संदर्भात जाब विचारला तर उत्तर काय द्यायचे. त्यामुळे कदाचित पळ काढत असावेत. त्यांचा राजकीय हेतू सकृतदर्शनीय शक्यतो कोणाला भावेल असे वाटत नाही. त्यात त्यांनी पक्षाला गृहीत धरून परस्पर लोकसभेऐवजी विधानसभा लढल्याचे भाष्य करणे पक्ष शिस्तीच्या चौकटीचे उल्लंघन ठरते, ते स्वतःच्या बचावासाठी कार्यकर्त्यांना आमदारकीचे गाजर दाखवत नाही, अशी वक्तव्य करून पारनेर तालुक्यातून स्थानिक स्वराज्य संस्थेत यश मिळवण्याचा त्यांचा आटापिटा दिसतो त्यात त्यांची लोकसभेतील कामगिरी उठून दिसणारी नाही कदाचित लोकसभेच्या उमेदवारीला पक्षांतर्गत स्पर्धक राहू नये ही खेळी असू शकते.

## तनपुरे पॅटर्न

खा. लंकेने राष्ट्रवादी (शप) ची लोकसभेला उमेदवारी केली नाही म्हणून पक्षाला सक्षम उमेदवार मिळणार नाही हा सुद्धा गैरसमज दिसतो. राष्ट्रवादीकडे ॲड. प्रताप ढाकणे आणि इतरही दिग्गज उमेदवार आहेतच. ऐनवेळी कोणी पुढे येऊ शकतो त्या संदर्भात राहुरी विधानसभेचे उदाहरण ताजे आहे. प्राजक्त तनपुरे यांनी उमेदवारी केली नाही म्हणून पक्ष थांबला नाही. गोविंद मोकाटे यांना उमेदवारी दिलीच. आता तनपुरेंची जी राजकीय अवस्था झाली, आमदारकीवर पाणी सोडावी लागली त्या तनपुरे पॅटर्नची पुनरावृत्ती होऊ शकते. भाजपकडून ऐनवेळी उमेदवारी कशी आणायची हे विखे पुरेपूर जाणतात, अशी शक्यता शक्यतो गृहीत धरता येत नाही. विखे नसतील तर भाजपकडे विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, महेंद्र गंधे आणि अन्य इच्छुक उमेदवार आहेतच. लोकसभेला कोण उमेदवार राहतील यापेक्षा खा. लंकेंनी आपले पत्ते खोलून राजकीय अपरिपक्वता अधोरेखित केली.

## झावरेंचा सल्ला

लोकसभा निवडणुकीपूर्वी टाकळी ढोकेश्वरच्या एका सभेत माजी आमदार नंदकुमार झावरे यांनी निलेश लंके यांना अनुभवाचा सल्ला दिला होता की लोकसभा निवडणूक न लढता विधानसभाच लढवा पण लंकेने त्याकडे दुर्लक्ष करून लोकसभा लढवून खासदारकी मिळवली पण आता ती त्यांना पेलवत नाही. म्हणूनच कदाचित त्यांनी हा यु-टर्न घेतला असावा असे एक ना अनेक अन्वायार्थ निघू शकतात. तुकाराम गडाख यांनी हा राजकीय प्रयोग केला होता तसा आंबेगावमध्ये माजी खासदार आढळराव पाटील यांनी सुद्धा तसे केले होते पण ते यशस्वी ठरले नाहीत. मग खा. लंके पुन्हा आमदार होतील याचे शाश्वती हातात कशी देता येईल.

**- रामदास ढमाले** (ज्येष्ठ पत्रकार)

## भागवतराव मुंगसे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - देवळालीप्रवरा येथील रहिवासी भागवतराव बाळासाहेब मुंगसे (वय ५८) यांचे २८ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर देवळाली प्रवरा अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. ते देवळाली प्रवरा येथील शेतकरी व शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख होत.

## बबन गायकवाड यांचे वृध्दापकाळाने निधन



नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी बबन बाजीराव गायकवाड (वय ८०) यांचे २८ एप्रिल रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २८ एप्रिल रोजी चिचोंडी पाटील, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ॲड. संजय बबन गायकवाड यांचे ते वडील होत.

## अरुण अरकल यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर- मोहनबाग दिल्लीगेट येथील रहिवासी अरुण गंगाधर अरकल (वय ६३) यांचे २७ एप्रिल रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २८ एप्रिल रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. बाळकृष्ण, वैभव, भूषण अरकल यांचे वडील होत.

## बन्सी खांदवे यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी बन्सी मारुती खांदवे (वय ९१) यांचे २८ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २८ एप्रिल रोजी चिचोंडी पाटील, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. राम आणि संजय खांदेव यांचे ते वडील होत.

## कमलबाई इंदानी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - कराचीवालानगर येथील रहिवासी श्रीमती कमलबाई राधाकिसन इंदानी (वय ८५) यांचे २७ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. धमेंद्र व राजेंद्र इंदानी यांच्या मातोश्री तर हरिष काबरा यांच्या त्या आजी होत.

## शोभाबाई बेल्हेकर यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - शिवाजीनगर, नवनागापूर येथील रहिवासी श्रीमती शोभाबाई गीताराम बेल्हेकर (वय ६०) यांचे २७ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २८ एप्रिल रोजी वडगाव गुप्ता वैकुंठधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. चेतना कॉलनी येथील शिवाय मेडीकलचे संचालक संदीप व अजय बेल्हेकर यांच्या त्या मातोश्री होत.

## बबईबाई ठाणगे यांचे दु:खद निधन



नगर - भोरवाडी (ता. नगर) येथील रहिवासी बबईबाई सुखदेव ठाणगे (वय ८०) यांचे २८ एप्रिल रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भोरवाडी (ता.नगर) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ॲड. विश्वनाथ ठाणगे यांच्या त्या मातोश्री होत.

## शांताबाई (माई) टेकाडे यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील शांताबाई (माई) गणपत मामा टेकाडे (वय ९७) यांचे वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले.

त्यांच्या पश्चात तीन मुले, चार मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. स्वर्गीय गणपत मामा टेकाडे यांच्या त्या पत्नी तर अशोक कारखान्याचे कर्मचारी बाळासाहेब टेकाडे, भाजीपाला आडतदार राजेंद्र टेकाडे व पुणे येथील कृषी सहाय्यक अधिकारी संजय टेकाडे यांच्या मातोश्री, शशिकांत, अभिषेक, प्रणिल व शौर्य टेकाडे यांच्या आजी होत.

# वाहतुकीला अडथळा होतो म्हणून हॉकर्स उठवायचे आणि तेथे पे अ‍ॅण्ड पार्क करायचे

(पान १ वरुन)

महापालिकेच्या अजब कारभाराचे दर्शन घडविले. सर्व हॉकर्स महापालिकेला कर भरतात. तसेच वाहतुकीला अडथळा न करता व्यवसाय करतात. मात्र, महापालिकेने हॉकर्स उठवून तेथे पे अ‍ॅण्ड पार्क केल्यास ती जागा पुन्हा अडविली जाणारच आहे. त्यामुळे हॉकर्सलाच तेथे व्यवसाय करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाने अतिरिक्त आयुक्त मुतकेकर यांच्याकडे २७ एप्रिल रोजी केली. यावेळी प्रशासनाने व्यापाऱ्यांच्या मागणीचा सकारात्मक विचार करण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे. मात्र, त्याचवेळी काढलेले टेंडर रद्द करण्याबाबत कोणतेही ठोस आश्वासन दिले नाही. विशेष म्हणजे नो हॉकर्स झोनचे टेंडर व पे अ‍ॅण्ड पार्कचे टेंडर वेगवेगळे काढणे अपेक्षित होते. मात्र, महापालिकेने दोन्ही टेंडर एकत्र काढून ठेकेदार धार्जिणे धोरण राबविले असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच शहरातील नो हॉकर्स झोनचा आराखडा तयार करताना टाऊन वेंडिंग कमिटीचे मतही विचारात घेतले नसल्याचा दावा व्यापाऱ्यांनी केला आहे.

महापालिकेने शहरातील तब्बल ३६ रस्ते ठेकेदाराच्या घशात घालण्याचा प्रस्ताव तयार केला असल्याचे सांगितले जाते. महापालिकेकडे याबाबत माहिती मागितली असता संबंधित कर्मचारी जनगणनेच्या प्रशिक्षणासाठी गेलेले असल्यामुळे ही माहिती देता येणार नाही, असे सांगण्यात आले. शहरातील ८ रस्त्यांवर नो हॉकर्स झोन प्रस्तावित असल्याचे सांगण्यात येते. तथापि, याबाबतही महापालिकेकडून अधिकृत माहिती देण्यात आली नाही. संबंधित अधिकारी सुट्टीवर आहेत, ते आल्यानंतर ही माहिती देता येईल, असे सांगण्यात आले.

### व्यापाऱ्यांच्या आक्षेपांबाबत सुनावणी घेणार : आयुक्त यशवंत डांगे

याबाबत महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्याशी संवाद साधला असता ते म्हणाले, शहरात कोठे-कोठे नो हॉकर्स झोन प्रस्तावित आहेत आणि किती व कोणकोणत्या रस्त्यांवर पे अ‍ॅण्ड पार्क प्रस्तावित आहे, याबाबत माझ्याकडे सविस्तर माहिती नाही. पण ही माहिती तुम्हाला नंतर उपलब्ध करुन देतो. व्यापाऱ्यांचे जे आक्षेप आहेत, त्याबाबत सविस्तर सुनावणी घेणार आहोत. अजून व्यापाऱ्यांच्या हरकतींवर सुनावणी घेतलेली नाही.

## विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांनी ३० जूनपर्यंत कागदपत्रे सादर करावीत

नगर - विशेष सहाय्य योजनेचा लाभ घेत असलेल्या लाभार्थ्यांनी १ एप्रिल ते ३० जून या कालावधीत तहसील कार्यालय, पारनेर अथवा त्यांच्या गावातील तलाठी यांच्याकडे हयात असल्याची नोंद करावी. तसेच एप्रिल ते जून या कालावधीत आवश्यक ती कागदपत्रे ३० जूनपर्यंत जमा करण्याचे आवाहन पारनेरच्या तहसीलदारांनी केले आहे.

ज्या लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेंतर्गत लाभ मिळत आहे, अशा लाभार्थ्यांनी तहसीलदारांकडील २०२५-२६ या कालावधीतील उत्पन्नाचा दाखला, हयातीचे प्रमाणपत्र आणि आधार कार्डाची छायांकित प्रत ३० जून पर्यंत जमा करावीत. तसेच या दोन्ही योजनांतील ५० वर्षे व त्यापुढील वयोगटातील लाभार्थ्यांनी उत्पन्नाचा दाखला दरवर्षी न देता तो पाच वर्षांतून एकवेळेस द्यावा.

## दत्तात्रय महेसुनी यांचे हृदयविकाराने निधन



नगर - श्रमिकनगर येथील रहिवासी दत्तात्रय चंद्रय्या महेसुनी (वय ७५) यांचे २८ एप्रिल रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते

## दिलीपराव लांडे पाटील यांचे निधन



शेवगाव - तालुक्यातील जोहरापूर येथील शेतकरी तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिलीपराव नरसिंगराव लांडे पाटील (वय ६७) यांचे २८ एप्रिल रोजी पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.

दिलीपराव लांडे पाटील यांनी जोहरापूरचे सरपंच म्हणून आपल्या सार्वजनिक राजकीय कारकीर्दीची सुरुवात केली होती. दिवंगत लोकनेते मारुतराव घुले पाटील यांचे ते अत्यंत विश्वासू सहकारी मानले जात. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्यावर त्यांनी तब्बल २५ वर्षे संचालक म्हणून यशस्वीपणे काम पाहिले. याशिवाय, अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या कृषी व पशुसंवर्धन समितीचे सभापती, शेवगाव पंचायत समितीचे सभापती, शेवगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आणि शेवगाव तालुका दूध व्यावसायिक संघाचे चेअरमन अशी अनेक महत्त्वपूर्ण पदे त्यांनी भूषविली होती. राष्ट्रवादी काँग्रेसच्या राज्य कार्यकारिणीचे सदस्य म्हणूनही त्यांनी दीर्घकाळ काम पाहिले.

माजी आमदार डॉ. नरेंद्र घुले पाटील व चंद्रशेखर घुले पाटील यांच्या खांद्याला खांदा लावून त्यांनी तालुक्याच्या विकासात मोठे योगदान दिले. मध्यंतरीच्या काळात त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. मात्र तेथे ते फार काळ रमले नाहीत. त्यांच्या पत्नी तथा जिल्हा परिषदेच्या माजी सभापती मीरा लांडे यांच्या अकाली निधनानंतर ते काहीसे राजकारणापासून अलिप्त झाले होते. त्यांच्या पश्चात मुलगा रोहन लांडे, स्नुषा सरपंच स्नेहल लांडे, तीन विवाहित कन्या राणी पानसंबळ, वर्षा पवार व मनीषा देशमुख, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर जोहरापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# कापड बाजार मधील नो हॉकर्स झोन व 'पे अ‍ॅण्ड पार्क'ला असोसिएशनचा विरोध

### उपजीविकेवर गदा; पुनर्वसनाशिवाय हटवणे बेकायदेशीर, टाउन वेंडिंग कमिटीचा सल्ला न घेता घेतलेला निर्णय रद्द करा



शहरातील कापड बाजार, मोची गल्ली आणि शहाजी रोड परिसरात महापालिका प्रशासनाच्या वतीने प्रस्तावित 'नो हॉकर्स झोन' आणि 'पे अ‍ॅण्ड पार्क' योजनेला हॉकर्स युनिटी असोसिएशनच्या वतीने विरोध दर्शविण्यात आला आहे. यासंदर्भात महापालिकेत अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर यांच्या उपस्थितीत झालेल्या सुनावणीत असोसिएशनच्या शिष्टमंडळाने भूमिका मांडत हरकती नोंदवल्या आणि निवेदन दिले.

नगर - शहरातील कापड बाजार, मोची गल्ली आणि शहाजी रोड परिसरात महापालिका प्रशासनाच्या वतीने प्रस्तावित 'नो हॉकर्स झोन' आणि 'पे अ‍ॅण्ड पार्क' योजनेला हॉकर्स युनिटी असोसिएशनच्या वतीने विरोध दर्शविण्यात आला आहे. यासंदर्भात २७ एप्रिल रोजी महापालिकेत अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर यांच्या उपस्थितीत झालेल्या सुनावणीत असोसिएशनच्या शिष्टमंडळाने भूमिका मांडत हरकती नोंदवल्या आणि निवेदन दिले.

या वेळी हॉकर्स युनिटी असोसिएशनचे अध्यक्ष साहेबान जहागीरदार, संतोष रासने, नवेद शेख, अन्सार पठाण, फिरोज पठाण, लक्ष्मी शिंदे, सुनीता शिंदे, दत्ता शिंदे, रुक्मिणी बिदरे, अलीम गफ्फार, सज्जाद रंगरेज, जावेद शेख, अन्सार पठाण, मुजाहिद पठाण, नितीन वाळके, नितीन पवार, हमजा शेख, अशरफ सय्यद, मीनाक्षी शिंगी, लता वाघमारे, परविन बागवान, अल्फिया शेख, कादर शेख, तारीक तांबोळी आदींसह हॉकर्स महिला व बांधव उपस्थित होते.

शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनात नमूद केले की, मागील ४० ते ५० वर्षांपासून पथविक्रेते या परिसरात व्यवसाय करत असून, ते नियमितपणे महापालिकेला कर भरत आहेत. अचानक या भागाला 'नो हॉकर्स झोन' घोषित केल्यास हजारो कुटुंबांवर उपासमारीची वेळ येईल. त्यामुळे हा निर्णय तात्काळ रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली.

निवेदनात केंद्र सरकारच्या 'पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम, २०१४' चा दाखला देत प्रशासनावर नियमभंगाचा आरोप करण्यात आला. असोसिएशनने स्पष्ट केले की, बायोमेट्रिक सर्वेक्षण झालेल्या पथविक्रेत्यांना प्रमाणपत्र देऊन पुनर्वसन केल्याशिवाय त्यांना हटवता येत नाही. अधिनियमाच्या कलम ३(३) नुसार हे संरक्षण ('शिल्ड') लागू होते, असेही नमूद करण्यात आले.

शहरातील 'नो हॉकर्स झोन' किंवा वाहतूक आराखडा तयार करताना 'टाउन वेंडिंग कमिटी' (टीव्हीसी) चे मत घेणे बंधनकारक असताना, या प्रक्रियेत हॉकर्सचे प्रतिनिधित्व विचारात घेतले गेले नाही, असा आरोप करण्यात आला. तसेच कायद्यानुसार टीव्हीसी मध्ये किमान ४०% सदस्य हे हॉकर्स प्रतिनिधी असणे आवश्यक आहे, मात्र प्रत्यक्षात तसे दिसत नसल्याचे सांगण्यात आले.

महापालिकेने वाहतुकीच्या कारणास्तव बदल करायचा असल्यास, त्याच परिसरात अधिकृत 'हॉकर्स झोन' विकसित करून कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली. 'नॅशनल पॉलिसी ऑन अर्बन स्ट्रीट वेंडर्स (२००९)' नुसार रस्त्यावर व्यवसाय करणे हा गरीबांच्या उपजीविकेचा मूलभूत अधिकार असल्याचेही अधोरेखित करण्यात आले.

'पे अँड पार्क' योजनेमुळे केवळ वाहनधारकांना सोय होईल, तर हॉकर्समुळे सर्वसामान्य नागरिकांना स्वस्त दरात वस्तू मिळतात, असा मुद्दा उपस्थित करण्यात आला. तसेच रस्त्यावर पार्किंगसाठी उभ्या राहणाऱ्या गाड्यांमुळेही वाहतुकीत अडथळा निर्माण होणार असल्याने हा निर्णय व्यवहार्य नसल्याचे सांगण्यात आले. हॉकर्सनी स्पष्ट केले की, ते आपल्या व्यवसायादरम्यान वाहतुकीस अडथळा होणार नाही याची काळजी घेतील. मात्र, व्यवसाय बंद करणे हा उपाय नसून प्रशासनाने समन्वय साधावा, अशी विनंती करण्यात आली.

कापड बाजार, मोची गल्ली आणि शहाजी रोड परिसरातील नो हॉकर्स झोन व पे अ‍ॅण्ड पार्कला संघटनेचा विरोध असून, हा निर्णय बेकायदेशीर असल्याचा आरोप करण्यात आला आहे. टाउन वेंडिंग कमिटीचा सल्ला न घेता सुनावणी घेणे चुकीचे असल्याचे सांगण्यात आले. अनेक हॉकर्सचे बायोमेट्रिक झाले असून, काहींना प्रमाणपत्र देखील मिळाले आहे. त्यांचे पुनर्वसन केल्याशिवाय त्यांना हटवता येणार नाही. रस्त्यावर पार्किंगसाठी उभ्या राहणाऱ्या गाड्यांमुळेही अतिक्रमण होणार असून, त्यामुळे वाहतुकीची समस्या सुटणार नाही. प्रशासनाने आधी टिव्हीसी समोर मुद्दा मांडून त्यांचे मत घ्यावे, त्यानंतरच पुढील निर्णय घ्यावा, असे साहेबान जहागीर दारयांनी व्यक्त केले.

## जहागीरदार यांचे महिलांनी केले औक्षण!

नो हॉकर्स झोन व पे अ‍ॅण्ड पार्कमुळे कापड बाजार परिसरातील अनेक महिलांचे रोजगार हिरावले जाणार आहे. या भितीने अनेक हॉकर्स महिला देखील चिंताग्रस्त असून, संघटनेच्या माध्यमातून त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आलेले साहेबान जहागीरदार यांचे स्वागत हॉकर्स महिला भगिणींनी औक्षण करुन केले.

# गृहिणी

## आरोग्य

### नखे उलगडतात आरोग्याची रहस्ये

आपली नखे केवळ आपल्या हातांचे सौंदर्यच वाढवत नाहीत, तर ती आपल्या आरोग्याविषयीची रहस्येदेखील उघड करतात. नखांचा रंग आपल्या शरीराच्या अंतर्गत आरोग्याचा एक महत्त्वाचा सूचक असू शकतो. नखे पिवळी पडणे हे अनेकदा जीवनसत्त्व किंवा खनिजांच्या कमतरतेचे लक्षण असते. कधीकधी, हे अति धूम्रपान, बुरशीजन्य संसर्ग किंवा यकृताच्या समस्येचे लक्षण असू शकते. नखांवरील पांढरे डाग अनेकदा झिंकच्या कमतरतेशी संबंधित असतात, तर निळसर रंग ऑक्सिजनची कमतरता किंवा फुफ्फुसांच्या समस्येचे द्योतक असू शकतो. खूप मऊ किंवा खूप जाड नखे हे एका गंभीर समस्येचे लक्षण असू शकते. मऊ किंवा ठिसूळ नखे निमिया किंवा रक्तातील पेशींची संख्या कमी असल्याचे दर्शवू शकतात. खूप जाड किंवा रेखीव नखे थायरॉईडच्या समस्या किंवा बुरशीजन्य संसर्ग दर्शवू शकतात.

## पाककला

### मखाना अक्रोड टिक्की

**साहित्य** – एक कप हंग कर्ड, १/४ कप किसलेले पनीर, चवीनुसार सेंधव मीठ, एक चमचा किसलेले आले, एक हिरवी मिरची बारीक चिरलेली, एक टेबलस्पून कोथिंबीर, एक टीस्पून मिरे पूड, दोन टेबलस्पून साबुदाणा पावडर, १/४ कप मखाना पीठ, दोन टेबलस्पून बारीक चिरलेले अक्रोड, दोन चमचे तूप

**कृती** – सर्वात आधी मखना आणि साबुदाण्यापासून पीठ तयार करा. आता एका पॅनमध्ये तूप घालून मखाना भाजून घ्या आणि मिक्सर जारमध्ये बारीक करून पावडर बनवा.साबुदाणा एका भांड्यात बारीक करून पावडर बनवा आणि खडबडीत भाग चाळणीतून गाळून वेगळा करा. आता गुळगुळीत आणि क्रीमयुक्त मिश्रण तयार करण्यासाठी एका प्लेटमध्ये पनीर चांगले मॅश करा. पनीरमध्ये आले, हिरवी मिरची, कोथिंबीर, मीठ, मिरे पूड, मखाना पीठ, साबुदाण्याचे पीठ आणि दही घाला आणि ते सर्व मिसळा. आता मिश्रणाचे छोटे गोळे बनवा आणि टिक्की बनवा. टिक्की साबुदाणा पीठ मखाना पीठ मध्ये भिजवून त्यावर अक्रोडाचे तुकडे लावा. पॅनमध्ये तूप लावून दोन्ही बाजूंनी भाजून घ्या. तयार टिक्की एक प्लेट मध्ये काढा आणि सर्व्ह करायला घ्या.

## वास्तू

### शनिवारी करा हे उपाय

शनिवारी हनुमानजींसमोर लवंग जाळणे शुभ मानले जाते. काही लोक कापूर घालून लवंग जाळतात. काही लोक दिव्यात ७-८ लवंग टाकतात आणि सलग ७ शनिवारी जाळतात. दिवा लावताना, तुमच्या मनात सकारात्मक विचार ठेवा आणि तुमच्या इच्छा प्रकट करा. दिवा लावल्यानंतर, दिव्याने आरती करा आणि शनिदेवाचा आशीर्वाद घ्या.

## सौंदर्य

ज्यांना केसांची लांबी कमी न करता स्प्लिट एन्ड्सपासून मुक्ती मिळवायची आहे त्यांच्यासाठी हेअर डस्टिंग हा एक चांगला पर्याय आहे.

## सल्ला

पालक उकळवून घ्या आणि मिक्सर मध्ये वाटून डीप-फ्रीज मध्ये ठेवा. पालक पनीर बनविताना आपण ह्याचा वापर करू शकता.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. २९ एप्रिल २०२६

**प्रदोष, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, वैशाख शुक्लपक्ष, हस्त २४|१६, सूर्योदय ०६ वा. २६ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आपली स्थिति, वास्तविकता वाढेल. पारिवारिकदृष्ट्या वेळ सामान्य. कामाचा ताण जाणवेल. वाहने व उपकरणे सावकाश हाताळावीत. मात्र बेफिकीर असायला नको.

**वृषभ** : उत्साह, आत्मविश्वास वाढेल. अडकलेला पैसा मिळेल. मनोरंजनात वेळ जाईल. अडचणी राहतील. दिवस निरुत्साही वाटेल.

**मिथुन** : खासगी कामाकडे जास्त लक्ष द्या. पैसा मिळेल. जबाबदारीची कामे पडतील. मागील उधारी उसनवारी वसुल होईल. दिवस आनंदात जाईल.

**कर्क** : शत्रुपक्ष हावी राहील. एखाद्या चुकीला पुन्हा करु नका. मन रमणार नाही. विश्वास कमी राहील. पितृचिंता सतावेल.शत्रुपक्ष डोके वर काढेल.

**सिंह** : मार्ग प्रशस्त होईल. अडकलेली कामे पूर्ण झाल्याने आनंद वाटेल. मित्रांची साथ लाभेल. नवपरिणीतांसाठी दिवस अत्यंत अनुकूल आहे.

**कन्या** : अडकलेला पैसा मिळेल. गुढ अनुसंधान करणाऱ्यांसाठी शुभ. गैरसमज दूर होतील. पत्नी व मुले यांचा आनंददायी सहवास लाभेल. अडकलेला पैसा मिळेल.

**तूळ** : आपल्या प्रयत्नाने उन्नती कराल. धनलाभ होईल. वरिष्ठांची मर्जी राहील. मातृचिंता सतावेल. वाहने व मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी लागेल.

**वृश्चिक** : आपल्या कामांची समाजात चर्चा होईल. लाभाच्या संधी. नवीन ओळखी संभवतात. आव्हानात्मक परिस्थितीचा सामना करतानाही यशस्वी व्हाल.

**धनु** : संपत्तीच्या कामात यश मिळण्याचे योग. मनात नवीन कल्पना सुचतील. आत्मविश्वास द्विगुणीत होईल.

**मकर** : आपली दूरदृष्टी आणि बुद्धीने अडकलेली कामे पूर्ण होतील. सामाजिक क्षेत्रात घवघवीत यश प्राप्त होईल. मागील केलेली भक्ती आज फळास येईल.

**कुंभ** : आर्थिक आणि सामाजिक कामांमुळे अडथळे. कामांची गती मंदावेल. मुलर-मुलींची चिंता सतावेल. हितशत्रू डोके वर काढण्याची शक्यता आहे. कालच्या दिवसाइतका आजचा दिवस चांगला जाणार नाही.

**मीन** : भूमी, घर विकत घेण्याचे योग. आरोग्यात सुधारणा. मानसिक स्थिती उत्तम राहिल. मागील चिंता दूर होतील. मात्र कार्यालयीन सहकार्यांशी सुसंवाद ठेवावे लागतील.

# शब्दगंध क्र. ७४१९

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ■ | ४ | ५ | ६ |
| ■ | ७ | | ■ | ८ | ■ | ९ | |
| १० | | ■ | ११ | | १२ | | |
| १३ | | ■ | | ■ | | ■ | ■ |
| | ■ | १४ | ■ | १५ | | १६ | |
| १७ | | | १८ | | ■ | | ■ |
| | ■ | १९ | | | ■ | २० | २१ |
| ■ | २२ | | | ■ | २३ | | |

**आडवे शब्द** : १) एक पक्षी ४) निमित्त; कारण ७) थंड; शीत ९) द्वार; कवाड ; दरवाजा १०) मूल्य; किंमत ११) परीस; एक जुना हिंदी चित्रपट १३) वाद्य वाजविल्यानंतर त्याचा काही काळ राहणारा आवाज; शेवट; अखेर १५) आस्था; आपुलकी १७) रिवाज; पद्धत; चाल १९) एक अरबी देश २०) फळातील रसाळ भाग; मगज २२) तेल निघणारे एक धान्य २३) कलेजा; हृदय; अंत:करण

**उभे शब्द** :- २) नाट्यशाळा ३) भय; भीती ५) कडक कवच असलेले एक फळ ६) लोणचे वगैरे ज्यात ठेवतात ते चिनी मातीचे भांडे ८) चिंता; काळजी १०) मोबदला घेऊन घरकाम करणारी स्त्री ११) लहान मुलाचा मुका १२) समस्त; सर्व १४) स्त्रियांचे एक वस्त्र १५) उणीव; कमतरता; वानवा १६) हाताचे किंवा पायाचे सर्वात लहान बोट १८) भुतांचा राजा २१) तीन गुणांपैकी एक; धूळ

**शब्दगंध क्र. ७४१८ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वि | ठ्ठ | ल | रा | म | जी | शिं | दे |
| ज | ■ | व | म | न | ■ | ग | व |
| न | भ | ■ | दा | ■ | पे | रू | ■ |
| वा | र | ■ | स | मू | ह | ■ | ग |
| स | व | त | ■ | ■ | रा | व | ण |
| ■ | सा | प | ■ | पा | व | ■ | ना |
| सो | ■ | शी | त | ल | ■ | पा | य |
| म | लू | ल | ■ | क | रं | ड | क |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : जीवनात यशस्वी होण्यासाठी सकारात्मक विचार आणि सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### उन्हाळ्यात रोपांना कोमेजण्यापासून कसे वाचवायचे?

उन्हाळ्यात वनस्पतींची आणि त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे थोडे अवघड असू शकते, विशेषतः जेव्हा त्यांच्यात पुरेसे कॅल्शियम नसते. वनस्पतींच्या चांगल्या आरोग्यासाठी देखील कॅल्शियम आवश्यक असते. कॅल्शियमच्या कमतरतेचा परिणाम पानांपासून झाडाच्या मुळांपर्यंत दिसून येतो. जर ही कमतरता वेळेत पूर्ण झाली नाही तर झाडाची वाढ थांबते आणि ती कोमेजू लागते. चला तर उन्हाळ्यात रोपांना टवटवीत कसे ठेवावे जाणून घेऊ या.....

वनस्पतींमध्ये खडू वापरण्याची पहिली पद्धत सर्वात सोपी आहे. यासाठी प्रथम झाडाला पाणी द्या. जेणेकरून कुंडीतील माती ओली होईल. आता त्यात खडूची एक काठी पुरून टाका. आता जेव्हा तुम्ही पाणी द्याल तेव्हा काही कॅल्शियम झाडांमध्ये जात राहील.

दुसऱ्या पद्धतीत, खडू बारीक करून त्याची पावडर बनवा. आता ही पावडर पाण्यात मिसळा आणि स्प्रे बाटलीच्या मदतीने शिंपडा किंवा थेट सर्व वनस्पतींच्या कुंड्यांमध्ये ओता. तुम्ही ते विविध फळे आणि फुलांसाठी वापरू शकता. घरातील वनस्पतींमध्ये हे मनी प्लांटसाठी सर्वोत्तम मानले जाते.

## अनोळखी

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका घनदाट जंगलात एक लांडगा राहायचा तो खूप धूर्त होता. एकदा लांडग्याने एक कोकरू पाहिले आणि त्याच्या मनात त्याला खाण्याचा विचार आला. आता त्याने कोकरू पकडण्याचा प्रयत्न केला. कोकरू धावू लागला आणि नदीच्या काठावर पोहचला. लांडगा कोकराला म्हणाला, घाबरू नकोस, मी तुला इजा करणार नाही. नदीतील पाण्याचा प्रवाह खूप वेगवान आहे. मी तुला नदी ओलांडण्यास मदत करेन. कोकरू लांडग्यांच्या खोट्या आश्वासनांना बळी पडला आणि त्याच्यावर बसून नदी पार करण्यास तयार झाला. आता नदीच्या मध्यभागी लांडग्याने कोकरूवर हल्ला केला आणि त्याला ठार मारून खाऊन टाकले. बिचारे कोकरू लांडग्याचे शिकार झाले.

तात्पर्य : कधीही कोणत्याही अनोळखीवर विश्वास ठेवू नये.

## जीवन का अमृत (भाग १)



सांसारिक काम काज बहुत अच्छे नहीं हैं, पर नामलेवाओं का कर्तव्य स्पष्ट है। उनका आदर्श उनके सामने है और उन्हें उसके लिए लगातार और प्रेम से कार्य करते रहना चाहिए। चाहे जो कुछ भी हो, नामलेवा सौभाग्यशाली हैं। उनके सिर पर सत्गुरु का हाथ है। वह सदा उनके फायदे का ध्यान रखता है और हर संभव सहायता तथा दया प्रदान करता है ।

कृपया घबराएँ नहीं, चाहे देश में हर जगह, हर वस्तु अस्त व्यस्त हो जाए। ऐसी घटनाएँ हो जाया करती है। गुरु-सत्ता प्यारे बच्चों को हर संभव सहायता और संरक्षण प्रदान करेगी।

अगर कुछ प्रिय बच्चे भटक जाएँ और सत्गुरु के उस महान प्यार और संरक्षण को स्वीकार न करें, जो वह अपने बच्चों को सदा प्रदान करता है, तो वे खुद अपनी आध्यात्मिक उन्नति में बाधा बनेंगे और इसमें केवल निवास स्थान को बदल लेने से कुछ सहायता नहीं मिलेगी ।

### समय मुश्किल है

हालाँकि समय दिन-प्रतिदिन और मुश्किल होता जा रहा है और इस धरती पर बुराई का बोल-बाला है, क्योंकि इंसान प्रभु को भूल चुका है, पर यह मौका है नामलेवाओं के लिए कि वे अपने आध्यात्मिक अभ्यासों के प्रति सच्चे रहे और अंतर में निरंतर तरक्की करें, क्योंकि वहीं पर उनकी सुरक्षा छुपी है और इससे न सिर्फ उनको सहायता मिलेगी, बल्कि औरों को भी फायदा पहुँचेगा।

१९. जब एक मोमबत्ती को जलाया जाए, तो इसे कहीं छुपाकर न रखें, बल्कि इसे ऐसी जगह पर रखना चाहिए, जहाँ से यह प्रकाश फैलाए, उन अंधों और संसार से दुखी बच्चों तक, जो सत्गुरु की छत्रछाया में अपने पिता के सच्चे घर का रास्ता ढूँढते हैं।

२०. कोई भी अन्य कार्य इतना ऊँचा या गौरवशाली नहीं हो सकता, जितना कि जूझती हुई आत्माओं की सहायता करना, जिसके द्वारा आत्माएँ अपने सच्चे घर का रास्ता पा सकती हैं और उनके अनंत संघर्ष का अंत हो सकता है।

२१. मुझे आपके बेशकीमत भाई की मृत्यु पर दुख हुआ, जिसे आप बहुत प्यार करते थे । वह एक प्यारा इंसान था और उसने एक शानदार अंत पाया तथा वह अपने पीछे, प्यारे भाई-बहनों के लिए एक परंपरा छोड़ गया, जो कि नामलेवाओं और अन्य लोगों को प्रेरणा देगी।

आप निश्चित रहें, परलोक में उसकी पूर्ण देखभाल हो रही है और शरीर त्यागने से पहले उसके चेहरे पर मधुर मुस्कान उसकी कृतज्ञता को दर्शाती है, जिसने यह बात पूर्णतया सिद्ध कर दी कि सत्गुरु उसके साथ थे उसको पूर्ण विश्वास के साथ सीढ़ी चढ़ते हुए देखने का आपका अनुभव इस बात का प्रमाण है कि वह परलोक में, अपने पिता के शाश्वत घर में निरंतर आनंद उठा रहा है

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

शिवानीदीदी : इथे दोन परिस्थिती आहेत. पहिली, कोणीतरी तुम्हाला फसवलं आणि तुम्ही दुखावले गेला. दुसरी, तुमचे मौल्यवान दागिने हरवले पण त्याचा तुमच्यावर काही परिणाम झाला नाही. दुसऱ्या परिस्थितीत, अप्रभावित राहण्याची शक्ती कोणाची होती ?

सुरेश ओबेरॉय : ती माझी शक्ती होती.

शिवानीदीदी : तुमच्या जागी दुसरं कोणी असतं तर कदाचित या दुःखातून अनेक दिवस बाहेर पडलं नसतं. अशा प्रकारे कोणत्याही परिस्थितीत स्थिर राहायचं की अस्वस्थ व्हायचं हे आपला गुण, संस्कारच ठरवतो.

सुरेश ओबेरॉय : पण हा तर जन्मत: मिळालेला गुण आहे.

शिवानीदीदी : हा आपण निर्माण केलेला संस्कार आहे. हा आपल्याला जन्मतः मिळालेला असेल किंवा आपण ह्या जन्मात किंवा मागच्या जन्मात निर्माण केलेला असेल पण आता हा संस्कार ही आपली प्रॉपर्टी आहे. आपल्या भावनांसाठी जर परिस्थिती जबाबदार असती तर तिने सगळ्यांच्या मनात सारख्याच भावना निर्माण केल्या असत्या.

सुरेश ओबेरॉय : म्हणजे आपल्या अस्वस्थतेसाठी परिस्थिती जबाबदार नाही.

### आपले संस्कार

शिवानीदीदी : कोण जबाबदार आहे?

सुरेश ओबेरॉय : पण हे असंच घडतं. मी अस्वस्थ होतो कारण मी असाच आहे. ह्याचा निर्माता मी आहे ? शिवानीदीदी : तुम्ही तुमच्या मनाला या संस्काराबरोबर प्रोग्रॅम केलं आहे.

सुरेश ओबेरॉय : हा माझा स्वभाव आहे.

शिवानीदीदी : स्वभाव म्हणजेच आपले संस्कार. आपण आपला स्वभाव बदलण्याच्या प्रवासात आहोत. पहिली पायरी म्हणजे आपले संस्कार आपले स्वत:चे आहेत हे स्वीकारणं. आणि ते असे आहेत म्हणून इतरांना दोष न देणं. संस्कार खूप खोल असतात. एकदा तो निर्माण झाला की आपण आपोआपच त्यानुसार प्रतिसाद देतो. हे संगणकावर एखादी कार्यप्रणाली इन्स्टॉल करण्यासारखं आहे. त्यानंतर सॉफ्टवेअर त्या प्रोग्रॅमिंगप्रमाणेच काम करतं. वर्षानुवर्षं आपण त्या प्रोग्रॅमद्वारे काम करत आहोत त्यामुळे आपण जाणीवपूर्वक सतत काहीतरी निर्माण करत आहोत हे आपल्या लक्षात येत नाही. कारण तो प्रोग्रॅम आपल्या आत आपोआपच सुरू आहे. पण, पहिल्यांदा हा प्रोग्रॅम कोणी निर्माण केला ? मी केला. 'आज मी हे प्रोग्रॅमिंग बदलू शकतो का?' हा खूप महत्त्वाचा प्रश्न आहे.

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल

सुरेश ओबेरॉय : स्वतःचं प्रोग्रॅमिंग करून मी ते विसरून गेलो असं मी म्हणू शकतो का ?

आपण काम करतो तेव्हा आपल्याला त्याची जाणीव नसते. माझे संस्कार ही शिवानीदीदी : हे प्रोग्रॅमिंग खूप पूर्वी तयार झालंय त्यामुळे जेव्हा त्या संस्काराबरोबर माझीच निर्मिती आहे, हे आपण आधी स्वीकारायला हवं. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, माझ्यातील कोणतेही संस्कार बदलण्याची शक्ती म इझ्यात आहे, हे माहीत असायला हवं.

सुरेश ओबेरॉय : माझे संस्कार बदलणं माझ्या हातात आहे ? शिवानीदीदी : हो, इतर कोणीच हे करू शकत नाही. माझ्या संस्कारांची निर्मिती करणारी 'मी'च होते. फक्त त्यांची निर्मिती कधी केली गेली हे आपल्याला आठवत नाही, ही वेगळी गोष्ट. संस्कार कसे बदलायचे हे एकदा माहीत झालं की ते बदलणं सोपं आहे.

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मुलगी : आई अगं, हे पहिले आठ दिवस वेळेवर घरी आले हल्ली उशिरा येतात त्यांची खोड मोडावी म्हणून माहेरी आले आहे मी.

आई : अगं हीच चूक मी केली होती. मी अशीच माहेरी जायची पण त्यामुळे तुझे बाबा सुखात राहायचे नवऱ्याची खोड मोडायची असेल तर त्याच्या बरोबरच राहा.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारताच्या युकी भांबरीने कोणत्या देशाच्या एलेक्सी पोपीरेनसह दुबई अजिंक्यपद टेनिस स्पर्धेचे दुहेरीचे अजिंक्यपद मिळविले आहे? – ऑस्ट्रेलिया

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

बदाम पेस्ट, दुधाची साय व गुलाबकळी एकत्र वाटून चेहऱ्याला लावल्यास चेहऱ्यावरील सुरकुत्या, काळे डाग, रूक्षता, मुरुमे जाऊन चेहरा टवटवीत व कांतियुक्त होतो. सहसा बदाम रात्री पाण्यात भिजत घालून सकाळी सोलून खावेत. याने स्मृतिभ्रंश, विस्मरण है आजार कमी होतात.

साखर –

भिजलेल्या बदामाची पेस्ट दुधात कालवून दूध उकळावे व त्याची गायीचे तूप, वेलची, घालून खीर बनवावी. ही खीर खाल्ल्याने अशक्तपणा व थकवा दूर होतो. तसेच वंध्यत्व असणाऱ्या रुग्णांनी नियमितपणे या खिरीचे सेवन करावे.

६) मेंदूची कार्यक्षमता कमी होऊन वारंवार डोकेदुखी होत असेल, तर बदामाची खीर खावी. यामुळे मेंदूची कार्यक्षमता वाढून डोकेदुखी थांबते. तीव्र डोकेदुखीमध्ये बदाम आणि कापूर दुधात उगाळून त्याचा लेप कपाळावर लावावा.

७) शरीरामध्ये चांगल्या कोलेस्टेरॉलची निर्मिती होण्यासाठी नियमितपणे चार बदाम रोज सकाळी अनुशापोटी खावेत. यामुळे चांगल्या कोलेस्टेरॉलची निर्मिती होऊन वाईट कोलेस्टेरॉलला प्रतिबंध केला जातो. त्यामुळे हृदयविकार, रक्तदाब हे विकार टाळले जातात.

### बदाम

८) जुनाट मलावरोधाची तक्रार असेल, तर नियमितपणे झोपताना सहा-आठ बदाम खाल्ल्यास रोज सकाळी पोट साफ होते.

९) चेहऱ्यावर काळे वांग आले असतील, ओठ काळे दिसत असतील, तर दुधाच्या सायीमध्ये बदाम उगाळून हळुवार मालीश करावे. यामुळे काळसरपणा दूर होतो.

१०) त्वचा कांतियुक्त होण्यासाठी बदामाचे तेल, चंदनतेल, लोणी व मध यांचे मिश्रण त्वचेवर हलक्या हाताने मसाज करावा. यामुळे त्वचेवरील सुरकुत्या कमी होऊन वर्ण उजाळतो.

११) मेंदू, हृदय, डोळे यांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी नियमितपणे बदामाचे सेवन करावे.

१२) शारीरिक व मानसिक स्वास्थासाठी, बाळंतिणीचे दूध वाढविण्यासाठी तिच्या शरीराची झीज भरून, वातप्रकोप कमी करण्यासाठी बदाम, काजू, डिंक, खोबरे, मनुका, चारोळी, पिस्ता, खारीक व गोंडबी यांचे गूळ घालून लाडू बनवून रोज नियमित एक खावा.

सावधानता :

सहसा बदाम बी ही कवचाच्या आत असल्या मुळे सुरक्षित आहे. फक्त बदाम खाताना अ प्रमाणात खाऊ नये. ते सारक गुणधर्माचे असल्यामुळे अति खाल्ल्यास जुलाब होऊ शकतात. सालीसह बदाम खाल्ल्यास त्याचे पचन त्रासदायक होते, म्हणून बदाम नेहमी रात्री भिजवून सकाळी त्याची साल काढूनच खावेत. त्यामुळे बदामाचे पचन सुलभ होते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००



महापालिकेच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेतील विजेत्यांसमवेत महापालिका आयुक्त यशवंत डांगे, मनपा क्रीडाधिकारी फिलिप्स यांच्यासह इतर अधिकारी. (छाया : लहू दळवी)

# अहिल्यानगर महापालिका क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत प्रभाग समिती दोनने पटकावली जनरल चॅम्पियनशीप

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचा उत्साहात समारोप झाला. या स्पर्धांमध्ये प्रभाग समिती क्रमांक दोनने उत्कृष्ट कामगिरी करत जनरल चॅम्पियनशिपचा बहुमान पटकावला.

समारोपप्रसंगी आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते विजेत्या कर्मचाऱ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी मनपा क्रीडा अधिकारी फिलिप्स तसेच अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयुक्त यशवंत डांगे म्हणाले, प्रत्येकाने आयुष्यात खेळ आणि कला जोपासली पाहिजे. दैनंदिन कामकाजातील ताणतणाव कमी करण्यासाठी क्रीडा स्पर्धा अत्यंत उपयुक्त ठरतात. शरीर हीच खरी संपत्ती असून ते निरोगी ठेवण्यासाठी नियमित व्यायाम आवश्यक आहे. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी आपल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडल्या पाहिजेत. अडचणींकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहणे गरजेचे आहे. खेळामुळे मानसिक ताकद वाढते आणि कठीण प्रसंगांना सामोरे जाण्याची क्षमता निर्माण होते. नागरिकांच्या समस्या शांतपणे ऐकून त्यांचे निराकरण करणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे. महापालिका ही नागरिकांची संस्था आहे, हे लक्षात ठेवून काम केले पाहिजे. कामाबरोबरच क्रीडा व इतर उपक्रमांमध्ये सहभाग घेतल्यास जीवन अधिक आनंदी आणि निरोगी होते, असेही त्यांनी सांगितले. भविष्यात क्रीडा स्पर्धांचे अधिक मोठ्या स्वरूपात आयोजन करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

स्पर्धेत जनरल चॅम्पियनशिप प्रभाग समिती क्रमांक दोनने पटकावली. घनकचरा विभागाने क्रिकेट स्पर्धेत विजेतेपद मिळविले. प्रभाग समिती क्रमांक तीन (झेंडी गेट) हे उपविजेते ठरले. उत्कृष्ट गोलंदाज म्हणून सागर वैरागर, उत्कृष्ट फलंदाज म्हणून सतीश वाघमारे यांना गौरविण्यात आले. बुद्धिबळ स्पर्धेत शहर अभियंता मनोज पारखे व संकेत आढाव यांनी विजेतेपद पटकावले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## कलेची अभिव्यक्ती

"मुसाफिर"
वाचनीय मननीय
प्रेरणादायी अक्षरधन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी
चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित
ललित चिंतन

माणसाचे जीवन हे साहित्य, संगीत आणि कलेशी जोडले की जीवनाच्या आनंदाची अनुभूती आपोआप उभी राहते. जीवनात व्यवस्था नाही, रचना नाही, सुसंगती नाही हे पाहून माणूस उद्विग्न होईल. दुःखी, कष्टी होईल. त्यामुळे कोठे व्यवस्था, रचना, सुसंगती दिसली की त्याला आनंद होतो. समाधान वाटते. या विसंगत जीवनात आपणही आपल्या अल्प कुवतीप्रमाणे काही रचना करावी, काही सुसंगती निर्मावी असे त्याला वाटते. त्याच्या या आर्त इच्छाशक्तितून मानवी संस्कृतीचा आणि पुढे कलेचा जन्म होतो. कला म्हणजे अभिव्यक्ती होय. विश्वसौंदर्य. निसर्गसौंदर्य यांची मानवी जीवनातील अभिव्यक्ती म्हणजे कला होय. कला ही एकीकडे सौंदर्याचे आकर्षण ठरली आहे तर दुसरीकडे आनंदाची सहजताही ती मिळवीत आहे. नुकतीच एक गोष्ट वाचण्यात आली. एका सुंदर आणि भव्य अशा मंदिराचे बांधकाम चालले होते. अनेक मजूर त्या बांधकामावर काम करीत होते. त्या सुंदर मंदिराच्या निर्मितीसाठी त्यांचे हात श्रमले जात होते. त्यातल्या काही मजुरांना 'हे काम कसं वाटतंय ?' विचारल्यावर ते म्हणाले, 'अहो, हे दगडधोंड्याचे काम आहे. हे जड दगडधोंडे उचलताना हाताला घट्टे पडले आहेत.'

त्यानंतर दुसऱ्या काही मजुरांना विचारले, 'हे काम का करता?' त्यावर ते म्हणाले, 'दिवसाचा रोजगार मिळतो म्हणून काम करतो.' शेवटी एका मजुराने मात्र अतिशय सुंदर उत्तर दिले. तो म्हणाला, 'मी मजूर आहे. मला दिवसभर श्रमाचे काम करावेच लागणार. मला मजुरीही मिळणार आहे पण त्याहीपेक्षा आनंद हा आहे की माझ्या हाताने एक भव्य मंदिर उभे राहणार आहे आणि अनेकांना ते मंदिर जगण्याची प्रेरणा आणि शांती देणार आहे.' अशा कृतीबाबत त्याच्या मनातील स्वाभाविक आनंद हेच कलानिर्मितीचे प्रेरणास्थान असते आणि प्रयोजनही. मानवी जीवन हे कलेच्या योगाने समृद्ध ज्ञानसाधना केल्याने बुद्धिची वाढ होते पण कलेच्या उपासनेने त्याच्या जीवनाचे भावनात्मक अंग परिपुष्ट होते. अन्नाच्या योगाने शरीराची पुष्टी होते पण कला आणि सौंदर्याच्या आस्वादाने मात्र मनाची तृप्ती होते. जगामध्ये दुःख, निराशा आहे, उणिवा आहेत पण त्या साऱ्या न्यूनतेला घालवून जीवनाला परिपूर्ण करण्याचे काम मात्र कलेची अनुभूतीच घडवू शकते. ही कलाच दुःखालाही पचवू शकते. त्या दुःखातूनच आनंदाचा अंकुरही फुलवू शकते. शरीर किंवा मनाला उपयुक्त अशा आल्हादकारक वस्तूंच्या निर्मितीसाठी माणसाच्या कर्तृत्वशक्तिचा कौशल्यपूर्ण प्रयोग होतो. तीच कलेची अभिव्यक्ती होय. त्यातील स्वाभाविकता हेच जीवनाचे सौंदर्य ठरते. प्रत्येकानेच हे जीवनसौंदर्य समरसून अनुभवायला हवे.

**– किशोर गांधी**

# कर्मवीर प्रबोधिनी प्रमाणपत्र स्पर्धा परीक्षेत लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेचे यश

**५ विद्यार्थी गुणवत्ता यादीत, अनुष्का धामणे व आदित्य औटी अव्वल**



नगर – कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेच्या विद्यार्थ्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या कर्मवीर प्रबोधिनी प्रमाणपत्र स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा छाप उमटवली आहे. या परीक्षेत शाळेतील पाच विद्यार्थ्यांनी संस्थेच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवून अभिमानास्पद कामगिरी केली.

इयत्ता चौथीतील कुमारी अनुष्का धामणे आणि चि. आदित्य औटी यांनी प्रत्येकी ९६ गुण मिळवत संस्थेत प्रथम क्रमांक पटकावला. चि. वेदांत राहींज आणि चि. आयुष सोनमाळी यांनी ९५ गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर चि. सरफराज शेख यांनी ९४ गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांनी ५ हजार, द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांनी ३ हजार आणि तृतीय आलेल्या विद्यार्थ्याने २ हजार रुपयाचे बक्षिस मिळवले.

या गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेत विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, डॉ. निक्रड, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर, पालक संघाचे सदस्य कैलास गुंजाळ तसेच शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

जयश्री खांदोडे आणि शितल रोहकले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे विभागीय अध्यक्ष तथा आमदार आशुतोष काळे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर, विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, गुणवत्ता कक्ष मार्गदर्शक काकासाहेब वाळुंजकर, जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे तसेच लाइफ मेंबर सदस्य शिवाजी लंके यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मधुमित्र मधुसखी पुरस्कारासाठी नामांकन प्रक्रिया सुरू, ४ मेपर्यंत अर्ज करावेत

नगर – महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत २०२६ सालासाठी मधुमित्र व मधुसखी पुरस्कार योजनेअंतर्गत नामांकन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मधमाशीपालन व्यवसायात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. इच्छुकांनी आपले नामांकन अर्ज ४ मे पर्यंत संबंधित जिल्हा कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत करण्यात आले आहे.

मधमाशीपालन क्षेत्रात अनेक वर्षे कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रथम, द्वितीय व तृतीय अशा तीन पुरस्कारांनी गौरविण्यात येणार आहे. त्यापैकी एक पुरस्कार महिलांसाठी राखीव असून, अनुक्रमे ११ हजार, ९ हजार आणि ५ हजार रुपये अशी रोख रक्कम देण्यात येणार आहे.

२० मे रोजी जागतिक मधमाशी दिनाचे औचित्य साधून पुणे येथे आयोजित समारंभात पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठीची सविस्तर माहिती व अर्ज मंडळाच्या www.mskvib.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच प्रत्येक जिल्ह्यातील खादी मंडळाच्या कार्यालयातही नामांकन अर्ज मिळणार आहेत. अधिक माहितीसाठी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, जिल्हा कार्यालय दूरध्वनी : ०२४१-२३५३४१० तसेच संचालनालयाच्या ०२१६८-२६०२६४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.



### प्रवर अधीक्षकांना 'स्नेहबंध'कडून ग्रंथभेट

जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून 'स्नेहबंध'संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या वतीने अहिल्यानगर डाकघरचे प्रवर अधीक्षक विकास पालवे यांना पुस्तक भेट देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी उपअधीक्षक डाक घर अमेय निमसूडकर, तक्रार निरीक्षक हनुमंत चव्हाण, सहा. लिपिक शिवाजी लांडे, सहा.लिपिक सागर पंचारिया, सहा.लिपिक सुनिल भागवत टपाल विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# मंथन व लक्षवेध राज्यस्तरीय परीक्षेत सविता रमेश फिरोदिया प्रशालेचे यश



नगर – सविता रमेश फिरोदिया प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच पार पडलेल्या मंथन केंद्रस्तरीय परीक्षा तसेच लक्षवेध राज्यस्तरीय परीक्षा यामध्ये उल्लेखनीय यश संपादन केले.

यावेळी चेअरमन दिलीप गुंदेचा, व्हाईस चेअरमन दशरथ खोसे, सेक्रेटरी र. धो. कासवा, सहसेक्रेटरी राजेश झालानी, खजिनदार ॲड. विजयकुमार मुनोत यांच्यासह सर्व विश्वस्त उपस्थित होते

मंथन केंद्रस्तरीय परीक्षेत इयत्ता पहिलीतील शिवांश संकेत गोंधळे (१२२ गुण) याने पाचवा क्रमांक पटकावला, तर इयत्ता दुसरीतील ज्ञानेश्वरी संदीप बोरुडे (१२६ गुण) हिने तिसरा क्रमांक मिळवला. याच इयत्तेतील शिवाजी सचिन शिंदे (११६ गुण) आठवा व श्लोक संतोष कुलांगे (११४ गुण) नववा क्रमांकावर राहिले. इयत्ता तिसरीतील सैफ आसिफ शेख (२७६ गुण) याने दुसरा क्रमांक मिळवला. चौथीतील सम्राट अशोक दहीहंडी (२८४ गुण) चौथा, तन्मयी केदारेश्वर तोडकर (२८२ गुण) पाचवा, रुद्र प्रकाश चौधरी (२७६ गुण) तिसरा ठरले. तसेच दुर्गा संकेत गोंधळे (२६० गुण) अकरावा, वेदिका गणेश सवणे (२५८ गुण) बारावा, त्रिधा श्रीकांत काळे (२५४ गुण) चौदावा, कृष्णा बालाजी डावखर (२५४ गुण) चौदावा, पृथ्वीराज सचिन चोभे (२५० गुण) पंधरावा क्रमांक पटकावला. पाचवीतील वेदिका अवधूत वाघचौरे (२७४ गुण) दुसरी, राजनंदनी सागर गायकवाड (२७२ गुण) तिसरी, त्वरिता निलेश लगड (२७० गुण) चौथी तर पायल किरण गायकवाड (२६४ गुण) सातवी ठरली. सहावीतील आरव संदीप रासकर (२२८ गुण) आणि सातवीतील तुबा फातिमा मौलवी व वेदिका विजय शिंदे (२२२ गुण) यांनीही उत्कृष्ट कामगिरी नोंदवली.

लक्षवेध राज्यस्तरीय परीक्षेत इयत्ता पहिलीतील अवनी अनिल बांगर (१४६ गुण) हिने तिसरा क्रमांक मिळवला. चौथीतील तन्मयी केदारेश्वर तोडकर (२९२ गुण) हिने तिसरा, दुर्गा संकेत गोंधळे (२८६ गुण) व सम्राट गणेश दहीहंडी (२८६ गुण) यांनी सहावा क्रमांक पटकावला. तसेच मंथन राज्य व जिल्हास्तरीय गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये सम्राट दहीहंडी (२८४ गुण) नववा व तन्मयी तोडकर (२८२ गुण) दहावा क्रमांक मिळवत विशेष प्रावीण्य सिद्ध केले.

लक्षवेध जिल्हास्तरीय परीक्षेतही विद्यार्थ्यांनी भरीव यश संपादन केले. इयत्ता पहिलीतील अनुश्री पांडुरंग अनारसे, अवनी सतीश गळंगे (१३४ गुण) यांनी दुसरा क्रमांक, शिवांश गोंधळे (१३२ गुण) तिसरा तर गौरव पतंगे, निशा अलंकार, श्रेया साके (१३० गुण) यांनी चौथा क्रमांक मिळवला. दुसरीतील शिवम संतोष दळवी (१३० गुण), श्लोक संतोष कुलांगे (१३० गुण) यांनी चौथा क्रमांक, शिवराज सचिन शिंदे (१२८ गुण) पाचवा क्रमांक मिळवला. तिसरीतील सैफ आसिफ शेख (२८२ गुण) दुसरा, ज्ञानेश्वरी मारुती पालवे (२७८ गुण) तिसरा क्रमांक मिळवला. पाचवीतील त्वरिता निलेश लगड (२६८ गुण) दुसरा व वेदिका अवधूत वाघचौरे (२६४ गुण) चौथा क्रमांक पटकावला.

या यशामागे प्रशालेतील इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला चालना देत सातत्याने केलेल्या परिश्रमांचे हे फळ असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी चेअरमन दिलीप गुंदेचा यांनी मार्गदर्शन करत सांगितले की, आजचा काळ हा ज्ञान, कौशल्य आणि नवोन्मेष यांचा संगम असलेला आहे. अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या विचारक्षमतेला चालना मिळते, त्यांच्या आकलनशक्तीत वाढ होते आणि ते केवळ पाठांतरावर न थांबता संकल्पनात्मक शिक्षणाकडे वळतात. सविता रमेश फिरोदिया प्रशालेने नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला आहे.

व्हाईस चेअरमन दशरथ खोसे म्हणाले की, आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी केवळ गुणांच्या मागे न लागता ज्ञानाच्या शोधात राहणे आवश्यक आहे. अशा परीक्षांमुळे त्यांच्यात आत्म विश्वास निर्माण होतो आणि यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेली जिद्द विकसित होते. संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आम्ही नेहमीच पाठबळ देत राहू.

संस्थेचे सचिव र. धो. कासवा म्हणाले कि विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश केवळ त्यांच्या वैयक्तिक प्रगतीचे द्योतक नाही, तर संस्थेच्या गुणवत्तापूर्ण कार्यपद्धतीचे प्रतीक आहे. प्रत्येक शिक्षकाने दिलेले मार्गदर्शन, पालकांनी दाखवलेला विश्वास आणि विद्यार्थ्यांनी केलेले कठोर परिश्रम यांचा हा एकत्रित परिणाम आहे. आगामी काळात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही आमचे विद्यार्थी आपली छाप उमटवतील, असा आम्हाला विश्वास आहे.

यावेळी सहसेक्रेटरी राजेश झालानी, खजिनदार ॲड. विजयकुमार मुनोत यांनी गुणवंत विद्यार्थी यांचे अभिनंदन केले. यावेळी विश्वस्त उपस्थित होते

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापिका योगिता गांधी यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, मंथन व लक्षवेध या परीक्षा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना देणाऱ्या आहेत. या परीक्षांमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती, आत्मविश्वास आणि अभ्यासातील सखोलता वाढीस लागते. आमच्या प्रशालेतील विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश त्यांच्या मेहनतीचे आणि शिक्षकांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनाचे फलित आहे. तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी यांचे सतत मिळत असणारे मार्गदर्शन यामुळेच आमचे विद्यार्थी यश प्राप्त करू शकले असे त्यांनी सांगितले.

# समता परिषदेचे संस्थापक छगनराव भुजबळ यांचे अहिल्यानगर शहरामध्ये स्वागत

नगर – अन्न व नागरी पुरवठा मंत्री तसेच अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष छगन भुजबळ यांच्या अहिल्यानगर दौऱ्यावेळी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद महानगरच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी महानगर शहराध्यक्ष ब्रिजेश ताठे व कार्याध्यक्ष अभिषेक चिपाडे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन भुजबळ यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी राज्य चिटणीस अंबादास गारुडकर, प्रथम महापौर भगवान फुलसौंदर, जिल्हा परिषद सदस्य अण्णासाहेब शेलार, कार्यकारिणी सदस्य कैलास फुलसौंदर, प्रकाश इवळे, राम व्यवहारे, प्रा. शिवाजी विधाते, देवेंद्र दुधाले, विश्वास शिंदे, शरद जाधव, अनुराग पडोळे, शुभम आव्हाड, निखिल ताठे, विशाल सुडके, स्वप्निल राऊत, अमृत क्षीरसागर, गणेश पडोळे, कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्याध्यक्ष अभिषेक चिपाडे यांनी महानगरच्या नव्या कार्यकारिणीची भुजबळ यांच्याशी ओळख करून दिली. शहरात संघटना अधिक बळकट करण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचा निर्धार व्यक्त करत महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्याची माहिती दिली.

यावेळी भुजबळ यांनी सर्व कार्यकर्त्यांना शुभेच्छा देत समाजात जागृती निर्माण करणे व संघटित होणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. संघटित होण्याचे निश्चितच सकारात्मक परिणाम दिसतात.

सर्वांना सोबत घेऊन प्रामाणिकपणे काम केल्यास समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करेल, असा सल्ला त्यांनी दिला.



अन्न व नागरी पुरवठा मंत्री तसेच अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष छगन भुजबळ यांचे अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद महानगरच्या वतीने स्वागत करण्यात आले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# माणिकताई करंदीकर विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनींच्या स्नेहमेळाव्यात 'माहेर' भेटीचा आनंद, १९६५ पासून आजपर्यंतच्या माजी विद्यार्थिनी आल्या एकत्र; आठवणींनी भारले शाळेचे वातावरण

नगर – येथील जानकीबाई आपटे बालिका आश्रम संस्था संचलित माणिकताई करंदीकर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, बालिकाश्रम रोड येथील मुलींच्या शाळेच्या १९६५ पासून आजपर्यंतच्या माजी विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला. अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या मैत्रिणी, शिक्षक आणि शाळेच्या आठवणींनी संपूर्ण परिसर अक्षरशः भारावून गेला. या मेळाव्यास राज्यभरातून सुमारे पाचशेहून अधिक माजी विद्यार्थिनी उपस्थित राहिल्या. पुणे, ठाणे, कल्याण, मुंबई, औरंगाबाद, नाशिक तसेच जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या विद्यार्थिनींनी पुन्हा एकदा शाळेच्या आवारात आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. कोणी आजी, कोणी आई, काकू, मावशी झालेल्या या सर्वांनी एकमेकींना भेटताच जुन्या आठवणींमध्ये हरवून गेल्या. शाळेतील वर्ग, मैदान आणि परिसर मैत्रीच्या हास्याने गजबजून गेला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. निरज करंदीकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या सचिव सौ. दीप्ती करंदीकर, माजी विद्यार्थिनी व विद्यमान नगरसेविका आशा डागवाले, नगरसेविका सुनीता फुलसौंदर, बुरुडगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश्री कुंटला, बालिकाश्रम बालक मंदिर प्राथमिक शाळेच्या माजी मुख्याध्यापिका राधिका लगड, सेवानिवृत्त ज्येष्ठ शिक्षिका हेमा चाफेकर यांची उपस्थिती होती. यावेळी विद्यालयाचे आजी–माजी शिक्षकवृंदही उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य अनिल सुद्रिक यांनी प्रास्ताविकात संस्थेचा गौरवशाली इतिहास उलगडला. इ.स. १९४३ मध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि उपेक्षित मुलींसाठी शिक्षणाची दारे खुली करण्याच्या उदात्त हेतूने कै. जानकीबाई आपटे यांनी या संस्थेची स्थापना केली. त्या काळात मुलींच्या शिक्षणाकडे समाज गांभीर्याने पाहत नसतानाही त्यांनी शिक्षणाचा दीप प्रज्वलित केला, ही गोष्ट आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यानंतर कै. माणिकताई करंदीकर यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली विद्यालयाने शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवले. तसेच कै. डॉ. जयंत करंदीकर यांच्या प्रेरणादायी कार्यामुळे संस्थेच्या प्रगतीला अधिक बळ मिळाले. या तिन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या त्याग, दूरदृष्टी आणि कार्यामुळेच संस्थेचा भक्कम पाया उभा राहिला असून, आजचा विकास हा त्यांच्या कार्याचा जिवंत वारसा असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

माणिकताई करंदीकर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजने हजारो विद्यार्थिनी घडवून त्यांना विविध क्षेत्रांत यशस्वी बनविले आहे. शिक्षण, वैद्यकीय, सामाजिक, प्रशासकीय आणि राजकीय क्षेत्रात अनेक माजी विद्यार्थिनी उल्लेखनीय कार्य करत असून, हीच संस्थेच्या कार्याची खरी पावती असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

प्राचार्य सुद्रिक यांनी सर्व माजी विद्यार्थिनींना सामाजिक बांधिलकी जपत संस्थेला सहकार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी योगदान देणारे दाते, सेवाभावी व्यक्ती, स्वयंसेवक आणि सर्व उपस्थितांचे त्यांनी आभार मानले.

यावेळी माजी विद्यार्थिनींच्या मनोगताचा कार्यक्रम विशेष भावनिक ठरला. अनेकांनी शाळेने दिलेले संस्कार, शिक्षकांचे मार्गदर्शन, मैत्रीच्या आठवणी आणि आयुष्यात घडवलेल्या व्यक्तिमत्त्वाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. काही जणी जुन्या आठवणी सांगताना भावूक झाल्या. शिक्षकांनीही विद्यार्थिनींच्या यशाचा अभिमान व्यक्त करत जुन्या आठवणींना उजाळा दिला.

अध्यक्षीय समारोपात डॉ. निरज करंदीकर यांनी भावनिक शब्दांत मनोगत व्यक्त करत सांगितले की, संस्थेचा तीन पिढ्यांचा सामाजिक कार्याचा वारसा अनुवंशिकतेतून माझ्यापर्यंत आला आहे. ही संस्था म्हणजे मुलींचे माहेरच असून, हा स्नेहमेळावा म्हणजे 'माहेर मेळावा' आहे. त्यांनी पुढे आश्वासन दिले की, संस्थेच्या हितासाठी विविध उपक्रम राबवून तिची उत्तरोत्तर प्रगती साधली जाईल. माजी विद्यार्थिनींचा जिव्हाळा आणि सहभाग हीच संस्थेची खरी ताकद असून, समाजातील सर्व घटकांनी सामाजिक कार्यासाठी हातभार लावण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

या स्नेहमेळाव्यात माजी विद्यार्थिनींनी आपल्या लाडक्या शिक्षक–शिक्षिकांची भेट घेत संवाद साधला. लग्नानंतर सासरी गेलेल्या अनेक जणींना जणू माहेरी आल्याचा आनंद लाभला होता.

स्नेह, आपुलकी, आठवणी, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम घडविणारा हा मेळावा सर्वांच्या कायम स्मरणात राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. माजी विद्यार्थिनींना स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वीणा दिघे यांनी केले. किशोर अहिरे यांनी आभार मानले. आश्रम प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली.



## उन्हाळ्याच्या झळांत वन्यजीवांना दिलासा, पाणवठ्यामध्ये सोडले पाणी

उन्हाळ्याच्या तीव्र झळा वाढत असताना जंगलातील नैसर्गिक पाण्याचे स्रोत आटत चालले आहेत. या पार्श्वभूमीवर प्रभाकरम फाउंडेशनने सामाजिक बांधिलकी जपत चास येथील वनविभागाच्या पाणवठ्यामध्ये टँकरद्वारे पाणी सोडण्याचा उपक्रम राबविला. दरवर्षीप्रमाणे यंदाही फाउंडेशनकडून हा उपक्रम सातत्याने राबविण्यात आला. कार्यकर्त्यांनी संबंधित पाणवठ्याची पाहणी करून टँकरच्या माध्यमातून पाणी सोडले. यामुळे बिबटे, हरिण, ससा, कोल्हा, माकड तसेच विविध पशु–पक्ष्यांना दिलासा मिळाला आहे. पाण्याअभावी वन्यप्राण्यांना मानवी वसाहतीकडे वळण्याची वेळ येऊ नये आणि त्यांचे नैसर्गिक अधिवास सुरक्षित राहावेत, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. यावेळी फाउंडेशनचे अध्यक्ष विपुल तापकीर, उपाध्यक्ष अभिषेक थोरात, सौरभ गावखरे आदी उपस्थित होते.

# डॉ.विखे पाटील अभियांत्रिकीत राज्यस्तरीय कॉम्रोत्सवचे आयोजन

नगर – स्पर्धेच्या युगात आज प्रत्येक अभियांत्रिकी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी तांत्रिक अभ्यासा सोबतच विविध अभ्यासक्रम आणि अभ्यासेतर उपक्रमांचा देखील अनुभव घेण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन फाउंडेशनचे तांत्रिक संचालक प्रा. सुनील कल्हापुरे यांनी केले.



विळद घाट येथील पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संगणक अभियांत्रिकी विभाग व संगणक अभियंता विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने कॉम्रोत्सव– २०२६ या दोन दिवसीय राज्यस्तरीय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या दोन दिवसीय महोत्सवामध्ये टेक केबिसी, युटोपिया (हॅकेथॉन) टेक ट्रेझर हंट, टेकएक्सलरेट, स्क्वीड गेम, रणभूमी, रंगमंच इत्यादी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांचे कौशल्य दाखविण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली. सदर महोत्सवामध्ये राज्यभरातील सुमारे ३५ महाविद्यालयातून ७१० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

या प्रंसगी तांत्रिक संचालक प्रा. सुनील कल्हापुरे, प्राचार्य डॉ. रविंद्र नवथर, डॉ.रविंद्र तांबे, प्रा.सौ.विद्या जगताप, डॉ. दीपक दरंदले उपस्थित होते. कॉम्रोत्सव– २०२६ च्या कार्यक्रम समन्वयक प्रा. रेणुका देवराय होत्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध मान्यताप्राप्त व्यावसायिक संस्था, संगणक विभागाचे प्रमुख प्रा.डॉ. एन.बी.विखे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, संगणक अभियंता, विद्यार्थी संघटनेचे विद्यार्थी यांनी सहकार्य केले. फाउंडेशनचे डायरेक्टर टेक्निकल प्रा. सुनील कल्हापुरे तसेच प्राचार्य डॉ.रवींद्र नवथर यांनी कार्यक्रमासाठी मार्गदर्शन केले.

या उपक्रमाचे संस्थेचे डायरेक्टर जनरल प्रशासन डॉ.पी.एम. गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील, तसेच संस्थेचे चेअरमन राधाकृष्ण विखे पाटील यांनी कौतुक केले.

# सन फार्मा विद्यालयात आरएसपी विद्यार्थ्यांना अग्निशमनाचे प्रशिक्षण

**प्रात्यक्षिकातून आपत्ती व्यवस्थापन, अग्निशामक दलाच्या कार्याचे धडे**

नगर – महाराष्ट्र राज्य पोलीस गृह विभाग आणि शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने वाहतूक सुरक्षा आणि नागरी संरक्षण या विषयांतर्गत नागापूर येथील सन फार्मा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आर.एस.पी. (राष्ट्र विद्यार्थी पोलिस) विद्यार्थ्यांसाठी विशेष अग्निशमन प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आग विझविण्याचे प्रत्यक्ष धडे देत आपत्कालीन परिस्थितीत कसे वागावे याचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

आजच्या धकाधकीच्या जीवनात वाढते तापमान आणि बदलते वातावरण यामुळे विविध प्रकारच्या आगीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. सध्या ३८ ते ४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचणाऱ्या तापमानामुळे इलेक्ट्रिक वाहनांना आग लागणे, माळरान व डोंगर पेट घेणे, घरगुती विजेच्या शॉर्टसर्किटमुळे किंवा गॅस गळतीमुळे लागणाऱ्या आगी अशा घटना वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आग लागल्यास योग्य उपाययोजना करून ती कशी नियंत्रणात आणावी याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले.







महानगरपालिका अग्निशामक दलाचे अधिकारी शंकर मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अग्निशामक बंबाच्या साहाय्याने विविध प्रकारच्या आगी विझविण्याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. तसेच विजेचे शॉर्टसर्किट झाल्यास घ्यावयाची खबरदारी, पावसाळ्यात पूरस्थितीत अडकलेल्या नागरिकांना कशी मदत करावी, उंच इमारतीं मध्ये आग लागल्यास लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्याचे तंत्र याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

या प्रात्यक्षिकामध्ये अग्निशामक दलाचे कर्मचारी शिवदास वांढेकर, सुरज पोकळे, भारत पाडगे, सिद्धार्थ खरात, मयूर लांडगे, अमोल ढमाले, आतेष भापकर, प्रभात साठे आणि नागनाथ नाईक यांनी सक्रिय सहभाग घेत आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या उपाययोजना प्रत्यक्ष करून दाखवल्या. विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या गजरात या कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयाचे मुख्याध्यापक रावसाहेब सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. आर.एस.पी. अधिकारी राजेंद्र धस व शंकर बारस्कर यांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वी झाला. यावेळी अरुण ससे, मंगेश निकम, वैभव काळे, रवींद्र गावडे आणि गुंजाळ मॅडम यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या शेवटी आर.एस.पी. अधिकारी राजेंद्र धस यांनी अग्निशामक दलाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार मानले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाबाबत जागरूकता निर्माण होऊन संकटसमयी धैर्याने व योग्य पद्धतीने प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी–शरदचंद्र पवार ख्रिश्चन विभाग(सेल)चा मेळावा खा.निलेश लंके यांच्या उपस्थितीत झाला.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार ख्रिश्चन विभागाचा मेळावा

नगर – राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी–शरदचंद्र पवार ख्रिश्चन विभाग(सेल) चा मेळावा खा.निलेश लंके व ख्रिश्चन विभागाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब साळवे यांचे प्रमुख उपस्थितीत आणि जिल्हाध्यक्ष संदीप वर्पे यांचे अध्यक्षतेखाली राष्ट्रवादी भवन, अहिल्यानगर येथे पार पडला. यावेळी विद्यार्थी जिल्हाध्यक्ष सुरज मोरे, योगीराज गाडे, धर्मगुरु संजय मिसाळ, धर्मगुरू वाघमारे, बिशप तानाजी पाडळे, अर्पण पाचारणे, छगन क्षेत्रे, प्रतिक पाचारणे, मधुकर कदम, किरण दरोडे, सुनील नेटके, मोजेस उरणकर, अनुष पाचारणे, गौरव केदारे, प्रमोद आंग्रे, नितीन भिंगारदिवे, शमशोन पाचारणे यांचेसह पक्षाचे राज्य व जिल्हा पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी–शरदचंद्र पवार पक्षाची ख्रिश्चन विभाग (सेल) ची पक्षसंघटन मजबूत करण्यासाठी राज्य व जिल्हा पदाधिकारी यांच्या निवडी करण्यात आल्या.

ख्रिश्चन विभागाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब साळवे म्हणाले कि, ख्रिश्चन समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी, प्रलंबित विविध मागण्या व त्यांचे प्रश्न आणि त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी हा ख्रिश्चन विभाग (सेल) कार्यरत आहे. तसेच हा विभाग ख्रिश्चन समाजाच्या हितासाठी शरदचंद्र पवार व पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सामाजिक उपक्रम राबवीत असतो.

जिल्हाध्यक्ष संदीप वर्पे म्हणाले कि, पक्षाचे ध्येय धोरण तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी आपण कटीबद्ध राहून प्रत्येक कार्यकर्त्यांनी आपला पक्ष कसा वाढवता येणार यासाठी प्रयत्न करावे. तसेच पक्ष देखील सदैव कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभा राहणार असून यापुढे अधिक सक्रीय काम करून पक्षसंघटना वाढीसाठी प्रयत्न करावे अशी आशा व्यक्त केली.

खासदार निलेश लंके म्हणाले कि, पक्षाच्या माध्यमातून समाजातल्या सर्व स्तरामधील शेवटच्या माणसांपर्यंत आपले नाते जोडले असून आगामी काळात ते कायम टिकविण्यासाठी यापुढेही आपल्याला एकत्रितपणे काम करून पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी प्रयत्न करावयाचे आहे. आपला कार्यकर्ता कितीही संकटात असला तरी त्याला ताकद देण्याची गरज आहे. ख्रिश्चन समाज हा शांतताप्रिय समाज आहे. शिक्षण, आरोग्य, व अन्य सेवा याकडे विशेष लक्ष देऊन येणाऱ्या काळात एक विचाराने सर्व जाती – धर्माच्या लोकाना पक्षासोबत जोडण्याचे काम काम करणार असल्याची भावना व्यक्त केली.

प्रास्ताविक अरविंद राठोड यांनी केले. प्रविण शिंदे यांनी आभार मानले.

# निर्मलनगरला अखंड हरिनाम, ज्ञानेश्वरी पारायणाची सांगता

नगर – सावेडी उपनगरातील निर्मलनगर येथील दत्त मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे येथील ग्रामस्थ, भजनी मंडळ, निर्मलनगर प्रतिष्ठाण तर्फे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहाचे हे ८ वे वर्ष होते. या सप्ताहासाठी संपूर्ण निर्मलनगर परिसरातील भाविकांचे मोठ्या प्रमाणात स्वतःहून मोठे योगदान मिळते. या सप्ताहामध्ये गेले ७ दिवस पहाटे ५ ते ७ काकडा, सकाळी ७ ते ८ विष्णुसहस्रनाम, सकाळी ८: ३० ते ११: ३० ज्ञानेश्वरी पारायण असे कार्यक्रम पार पडले तर दुपारच्या सत्रात दुपारी २ ते ४ भजनी संध्याचा कार्यक्रम पार पडला.सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री हरीकीर्तन तसेच रात्री ८ ते १० कीर्तनाचा कार्यक्रम पार पडला. यामध्ये नामवंत कीर्तनकारांनी सहभाग घेतला. ह भ प कृष्णा महाराज रायकर राम महाराज घुले आबा महाराज कातोरे अमोल महाराज जाधव रामदास महाराज रक्ताटे ज्ञानेश्वर महाराज भिसे कारभारी महाराज झरेकर यांनी सुंदर असे कीर्तन सादर केले.



निर्मलनगर येथे अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण सोहळा पार पडला. हभप विद्याताई हारदे यांनी पारायण वाचन केले. समवेत भाविक, महिला आदी (छाया – विजय मते)

सकाळी ८: ३० ते ११:३० ज्ञानेश्वरी पारायण व्यासपीठ चालक हभप विद्याताई हारदे यांनी वाचन केले. भक्ती संध्या कार्यक्रमात निर्मलनगर, लक्ष्मीनगर, शिवनगर, सूर्यनगर, तवलेनगर, ढवणं वस्ती, भगवान बाबा चौक येथील भजनी मंडळांनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमाला गायन हभप रवींद महाराज आव्हाड, कानिफ महाराज पंडित, आरती महाराज हुलमुखे यांनी केले तर त्यांना पिंपळगाव माळवी येथील भक्ती वेदांत गुरुकुल वारकरी शिक्षणसंस्थेच्या विद्यार्थ्यांनी साथ दिली. मृदुंगाचार्य हभप श्रीकांत महाराज कोहोक, ओंकार महाराज उनवणे यांनी केले.

या अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सांगता हभप श्रीनिवास महाराज घुगे यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. यावेळी भाविक, नागरिक उपस्थित होते. काल्याचे कीर्तनानंतर महाप्रसादाला लाभ सर्व भाविकांनी घेतला. सप्ताहाचे संयोजक, आयोजक यांनी विशेष परिश्रम घेऊन सप्ताहाची सांगता यशस्वीपणे पार पाडली.

# गोमातेच्या रक्षणासाठी मकोका सारखा कठोर कायदा व्हावा : आ. संग्राम जगताप

नगर – राज्याने गोमातेला राजमातेचा दर्जा दिला, गोमातेच्या रक्षणासाठी कायदे केले मात्र आजही गोहत्या थांबलेली नाही, गो हत्या थांबायचे असेल तर त्यासाठी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायदा (मकोका) सारखा व्हावा या व इतर मागण्यांचे निवेदन आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वात तहसीलदार यांना देण्यात आले.

गोमातेच्या रक्षणासाठी शासनामार्फत विविध कायदे करण्यात आले. राज्य मातेचा दर्जा देण्यात आला मात्र त्याची अंमलबजावणी कठोरपणे होत नसल्याने संघटित पद्धतीने गोमातेची तस्करी–हत्या आजही होत आहे हे चित्र उद्विग्न करणारे आहे. यासाठी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायदा अर्थात मकोकासारखा कठोर कायदा लोकसभेत संमत व्हावा. गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा मिळावा, गोमातेचे संगोपन करणाऱ्यांना शासनामार्फत अनुदान देण्यात यावे, या सर्वांसाठी केंद्र शासनाने स्वतंत्र गोमंत्रालय स्थापन करावे आदी मागण्यांचे २१ हजार नगरकरांच्या सह्यांचे निवेदन तहसीलदार व नायब तहसीलदार यांना देण्यात आले.

याप्रसंगी बापू ठाणगे यांनी गोमातेचे रक्षण करणे हे राष्ट्रीय कर्तव्य असून यासाठी हिंदू धर्मात धर्मीय पुर्ण देशभर एकवटले असून आज एकाच वेळी काश्मीरपासून कन्याकुमारी पर्यंतच्या पाच हजार तहसील कार्यालयांमध्ये निवेदन देण्यात येत आहे. ही ऐतिहासिक घटना आहे. संत मंडळींच्या आवाहनाला प्रतिसाद देत देशभरातून गो सेवक, गोप्रेमी मोठ्या संख्येने मागण्यांचे निवेदन देत आहेत. अहिल्यानगर मध्ये ही भिंगार,



गोमातेच्या रक्षणासाठी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायदा (मकोका) सारखा व्हावा या व इतर मागण्यांचे निवेदन आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वात तहसीलदार यांना देण्यात आले. (छायाचित्र : उदय जोशी)

केडगाव, सावेडी व विविध उपनगरातील नागरिकांनी निवेदनावर सह्या केल्या आहेत. शहराप्रमाणेच जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये ही अशाच प्रकारचे निवेदन एकाच वेळी देण्यात येत आहे अशी माहिती दिली.

सावेडीतील दिनूभाऊ कुलकर्णी जॉगिंग ट्रॅक परिसरात सर्व गो प्रेमी सकाळी एकत्र जमले होते. भजनी मंडळाच्या वारकऱ्यांनी भजन संकीर्तन करून गो मातेच्या रक्षणासाठी आवाहन केले. महेंद्र गंधे, सौ. मिनल गंधे, नगरसेवक ऋग्वेद गंधे यांनी सहभागी वारकरी संप्रदायातील विद्यार्थ्यांचे पूजन करून पदयात्रा मार्गस्थ झाली. यावेळी सर्व गोप्रेमीवर पुष्पवृष्टी करण्यात आली.

कलानगर चौक, छत्रपती संभाजी महाराज चौक मार्गे समर्थ विद्यामंदिर वरून धर्मवीर चौक येथे पदयात्रा भजन संकीर्तन करत आली तेथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याला गोसेवकांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला व तेथून सर्व गो सेवक तहसीलदार कार्यालयात जमा झाले. तहसीलदार, नायब तहसीलदार व अधिकाऱ्यांनी या पदयात्रेला कार्यालयाबाहेर सामोरे येत निवेदन स्वीकारले. याप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी, महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व तहसीलदार अहिल्यानगर यांना निवेदनाच्या प्रती देण्यात आल्या.

याप्रसंगी बापू ठाणगे, डॉ.अर्जुन घुले, दिनेश खंडेलवाल, गोकुळ आठरे, श्रीमती सुरेखा सांगळे, भरत बोरुडे, योगेश जामगावकर, भैय्या काशिद, संजय जोशी, राजन साळुंकै, अजित कटारिया, अजिंक्य गायकवाड, भारत शिंदे, अनिकेत शिंदे, माऊली गोशाळेचे संचालक माऊली व परीवार, ब्रह्मचैतन्य गोशाळेचे गौतम कराळे व सहकारी, गुंडेगाव येथील गोशाळेचे भापकर विविध गोशाळेचे संचालक विविध मंदिरांचे पुजारी, व्यापारी प्रतिनिधी वृद्ध व महिला उपस्थित होते.

## इन्स्टाग्रामवर एआय फोटोंच्या माध्यमातून महिलेची बदनामी; गुन्हा दाखल

नगर – कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआयद्वारे एका महिलेचे आक्षेपार्ह फोटो तयार करुन ते इन्स्टाग्राम स्टोरीवर प्रसारित करुन तिची समाजात बदनामी केल्याप्रकरणी येथील सायबर पोलीस ठाण्यात एक तरुण व संबंधित खातेधारकावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. नेवासा तालुक्यातील एका मोबाईल दुकानदाराने या संदर्भात फिर्याद दिली आहे. फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार, एका संशयित इन्स्टाग्राम खातेधारकाने फिर्यादीच्या पत्नीबद्दल अत्यंत अश्लील मजकूर आपल्या स्टोरीमध्ये लिहिला होता. इतकेच नव्हे तर, फिर्यादी आणि गावातील एका महिलेचे छायाचित्र घेऊन कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने (एआय) आक्षेपार्ह फोटो तयार करण्यात आले. हे बनावट फोटो सोशल मीडियावर सार्वजनिक करून दोघांचीही मोठी बदनामी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. हा प्रकार मार्च महिन्यापासून सुरू होता. वारंवार होणाऱ्या या त्रासाला कंटाळून अखेर पीडित व्यक्तीने सायबर पोलिसांकडे धाव घेतली. पोलिसांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यातील विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, आरोपीचा तांत्रिक शोध घेतला जात आहे. सोशल मीडियाचा वापर करताना नागरिकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## भोसले आखाड्यात ओपन स्पेसमध्ये आग, झाडे, झुडपे जळून खाक, रहिवासी बचावले

नगर – शहरातील बुरुडगाव परिसरातील भोसले आखाडा ते विनायकनगर रस्त्यालगत असलेल्या ओपन स्पेसला २८ एप्रिल रोजी दुपारी १२.५० वाजेच्या सुमारास आग लागली. वारे असल्यामुळे व या ओपन स्पेसमध्ये वाळलेले गवत आणि झाडी असल्यामुळे आगीने काही क्षणातच रौद्र रुप धारण केले. मात्र, अग्निशमन विभागाचे दोन अग्निशामक बंब वेळेवर पोहोचल्यामुळे त्यांनी आग आटोक्यात आणली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

याबाबत समजलेली माहिती अशी की भोसले आखाडा ते विनायकनगर रस्त्यालगत असलेल्या मोकळ्या जागेत झाडीझुडपे व वाळलेले गवत होते. शेजारीच शेतजमीन आहे. या मोकळ्या जागेच्या बाजुलाच रहिवासी कॉम्प्लेक्स आहे. या गवताने पेट घेताच वाळलेली झाडेही पेटली. त्यामुळे काही मिनिटातच आगीने रौद्र रुप धारण केले. ही आग रहिवासी कॉलनीच्या भिंतीपर्यंत पोहोचली होती. स्थानिक नागरिक धनंजय भोसले यांनी महापालिकेच्या अग्निशमन विभागाला तातडीने आग लागल्याची माहिती दिली. त्यानंतर महापालिकेचे दोन अग्निशामक बंब १ वाजून ५ मिनिटांनी घटनास्थळी दाखल झाले. वारे असल्यामुळे आग मोठ्या प्रमाणात पसरली होती. या दोन्ही बंबांद्वारे ही आग आटोक्यात आणण्यात आली. अगोदर रहिवासी परिसरातील आग विझविण्यात आली. त्यानंतर इतर ठिकाणी पसरलेली आग विझविण्यात आली. ही आग नेमकी कशामुळे लागली होती, याचे कारण समजू शकले नाही. ही आग विझविण्यासाठी महापालिकेच्या अग्निशमन विभागाचे प्रमुख मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली फायरमन महेश जाधव, करण राठोड, मच्छिंद्र चितळे, प्रविण पालवे, सौरभ दराडे यांच्यासह वाहन चालक सिकंदर वाकरे, ज्ञानेश्वर चाकणे यांनी परिश्रम घेतले.



बुरुडगाव परिसरातील भोसले आखाडा ते विनायकनगर रस्त्यालगत असलेल्या ओपन स्पेसमध्ये लागलेली आग विझविताना महापालिकेच्या अग्निशमन विभागाचे कर्मचारी.

## प्रॉपर्टी नावावर करण्यासाठी मुलाकडून निवृत्त सुभेदाराला लोखंडी रॉडने मारहाण

नगर – केडगाव येथील वैष्णवनगर परिसरात राहत असलेल्या भारतीय सैन्यदलातील सेवानिवृत्त सुभेदाराला आपल्याच मुलाने घराची संपूर्ण प्रॉपर्टी स्वतःच्या नावावर करण्यासाठी लोखंडी रॉडने बेदम मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सदाशिव शंकर भिंगारदिवे (वय ६१) हे भारतीय सैन्यातून निवृत्त सुबेदार असून ते केडगाव येथील तिरंगा चौकात वास्तव्यास आहेत. २६ एप्रिल रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास त्यांचा मुलगा आरोपी शिवम शंकर भिंगारदिवे याने घरातील मालमत्ता स्वतःच्या नावावर करण्यासाठी तगादा लावला. मात्र, सदाशिव यांनी मालमत्ता आताच नावावर करण्यास नकार दिला. याचा राग मनात धरून शिवमने आपल्या वडिलांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

रागाच्या भरात शिवमने घरातील लोखंडी रॉड घेऊन वडिलांवर हल्ला केला आणि त्यांना शारीरिक इजा पोहचवली. तसेच मालमत्ता नावावर न केल्यास जीवे मारण्याची धमकीही दिली. या घटनेनंतर सदाशिव भिंगारदिवे यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये आरोपी शिवम विरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार गाजरे करत आहेत. मुलानेच वडिलांवर जीवघेणा हल्ला केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

## इलेक्ट्रिकल दुकानातून चोरी; हजारो रुपयांची वायर लंपास

नगर – अहिल्यानगर–छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील जेऊर (ता. नगर) येथील एका इलेक्ट्रिकल दुकानाचे पत्रे उचकटून चोरट्यांनी सुमारे ६० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना २७ एप्रिल रोजी उघडकीस आली. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जेऊर येथील गुरु माऊली इलेक्ट्रिकल हे दुकान फिर्यादी कैलास बाबासाहेब ससे (वय २६, रा. रासेवाडी) यांच्या मालकीचे असून, त्यांनी आपले दुकान २६ एप्रिल रोजी सायंकाळी नेहमीप्रमाणे बंद केले होते. दुसऱ्या दिवशी ते सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास दुकान उघडण्यासाठी आले असता दुकानात चोरी झाल्याचे दिसून आले. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने दुकानाच्या पाठीमागील बाजूचे पत्रे उचकटून आत प्रवेश करुन दुकानातील १२०० रुपये किलो दराची एकूण ५० किलो वजनाची कॉपरची इलेक्ट्रिक वाइंडिंग वायर चोरून नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चौधरी आणि पोलीस हवालदार अडबल यांनी घटनास्थळाची पाहणी केली. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास पोलीस हवालदार खेडकर करत आहेत.

# अहिल्यानगर प्रशासनाविरोधात ११ मे रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयावर धरणे आंदोलन

### वंचित बहुजन आघाडीचा एल्गार

नगर – जिल्ह्यातील वंचित समाजावर होणाऱ्या अन्याय–अत्याचाराच्या घटनांमध्ये पोलीस प्रशासन निष्क्रिय असल्याचा आरोप करत, वंचित बहुजन आघाडीने प्रशासनाविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. पोलिसांच्या कथित तांत्रिक फसवणुकीचा आणि पुरावे दडवण्याच्या वृत्तीचा निषेध करण्यासाठी ११ मे रोजी सकाळी १०:३० वाजता पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर जन आक्रोश धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

### प्रशासनावर 'NC' द्वारे फसवणुकीचा आरोप

वंचित बहुजन आघाडीने पोलीस प्रशासनावर गंभीर आरोप केले आहेत. पीडितांच्या तक्रारींची दखल न घेणे, गंभीर गुन्ह्यांमध्ये केवळ अदखलपात्र गुन्हा नोंदवून आरोपींना अभय देणे आणि पीडितांवरच खोटे प्रति–गुन्हे दाखल करणे, अशा प्रकारांमुळे जिल्ह्यात वंचितांवर अन्याय वाढत असल्याचे पक्षाने म्हटले आहे. माहिती दडवणे हा देखील गुन्हा असून प्रशासन दोषी अधिकाऱ्यांना पाठीशी घालत असल्याचा दावा जिल्हाध्यक्ष योगेश साठे आणि उत्तर जिल्हाध्यक्ष, नगरसेवक संतोष चोळके यांनी केला आहे.



प्रशासनाविरोधात ११ मे रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयावर धरणे आंदोलन करण्याबाबत पोलिस अधीक्षकांना वंचित बहुजन आघाडीच्यावतीने निवेदन देण्यात आले.

### आंदोलकांच्या प्रमुख मागण्या

गेल्या ६ महिन्यांतील सर्व 'NC' प्रकरणांची यादी जाहीर करून त्यांचे FIR मध्ये रूपांतर करावे., कर्तव्यात कसूर करणाऱ्या आणि माहिती दडवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी., पीडितांवर दाखल केलेले खोटे गुन्हे रद्द करण्याबाबत लेखी भूमिका स्पष्ट करावी., अत्याचार प्रकरणांतील फरार आरोपींच्या अटकेसाठी निश्चित मुदत द्यावी.

पोलीस प्रशासनाने आमच्या मागण्यांवर जोपर्यंत अधिकृत लेखी उत्तर दिले जात नाही, तोपर्यंत हे आंदोलन सुरूच राहील. न्याय न मिळाल्यास खुर्च्या खाली करा! असा इशारा योगेश साठे आणि संतोष चोळके यांनी दिला आहे.

या आंदोलनाला मार्गदर्शनासाठी पक्षाचे राज्य महासचिव प्रा. किसन चव्हाण, राज्य उपाध्यक्ष दिशा पिंकी शेख, राज्य प्रवक्ते ॲड. अरुण जाधव आणि राज्य प्रवक्ते उत्कर्षाताई रुपवते यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

यावेळी जिल्हा संघटक सुधीर ठोंबे, नगर तालुकाध्यक्ष रविकिरण जाधव, मनोज साळवे, शेवगाव युवा तालुकाध्यक्ष ऑगस्टीन गजभिव, विनायक गडाख, अनिकेत पवार, लुकास गजभिव, बाळू गजभिव, अनिकेत गजभिव, गोविंद गजभिव, छानराज क्षेत्रे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आंदोलनादरम्यान उद्भवणाऱ्या कोणत्याही कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीला सर्वस्वी पोलीस प्रशासन जबाबदार असेल, असेही निवेदनाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

## अवैध वाळू साठ्या संदर्भातील नगर तहसीलदारांचा आदेश रद्द

नगर – तहसीलदार नगर यांनी अवैध वाळू साठ्या संदर्भात ५/२/२०२० रोजी प्लॉट धारकावर रक्कम रु. १६,४१,६०० चा दंड आकारून स्थावर मालमत्ता जप्तीचा आदेश केला होता. श्री. जगनाडे यांचे घर बांधकामासाठी ५४ ब्रास वाळू अवैधरित्या साठा केल्याप्रकरणी व मंडल अधिकारी यांनी छापा टाकून पंचनामा करून कारवाई केली होती. त्याआधारे तहसीलदार, नगर यांनी वरीलप्रमाणे आदेश करून श्री. जगनाडे यांचेवर दंडात्मक कारवाई केली होती. श्री. जगनाडे यांनी तहसीलदार यांचे आदेशाविरुद्ध अहमदनगर येथील प्रधान दिवाणी न्यायाधीश यांचे कोर्टात दावा दाखल केला. प्रस्तुत दावामध्ये न्यायालयाने तहसीलदार यांचा रक्कम रु. १६,४१,६०० दंडाचा आदेश, तसेच श्री. जगनाडे यांच्या स्थावर मिळकतीवर लावलेला जप्तीचा आदेश रद्द ठरवून लिलाव प्रक्रिया करू नये असा आदेश पारित केला.

या प्रकरणात श्री. जगनाडे यांचे विधीज्ञ सुहास टोणे यांनी पंचनाम्यातील त्रुटी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या तसेच तहसीलदार यांचा आदेश कसा बेकायदेशीर आहे, याबाबत प्रभावी युक्तिवाद केला. त्यामुळे न्यायालयाने तहसीलदार यांचा आदेश रद्द ठरविला. या प्रकरणात विधीज्ञ सुहास टोणे यांना ॲड. अमित अडागळे, ॲड. विलास ढोणे, ॲड. शिवानी सापिके, ॲड. ओम गुंड व ॲड. अक्षय शिंदे यांनी सहकार्य केले.

## धक्का लागल्याच्या वादातून तरुणाच्या तोंडावर चॉपरने वार

### पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – शहराजवळील नेप्ती येथील रानमळा परिसरात धक्का लागल्याच्या किरकोळ कारणावरुन एका तरुणावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. आरोपींनी संबंधित तरुणाच्या तोंडावर चॉपरने वार करुन त्याला गंभीर जखमी केले. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात २७ एप्रिल रोजी रात्री १०.२० वाजता पाच जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी संकेत अर्जुन मोरे (वय २७) हे २४ एप्रिल रोजी नेप्ती येथील बिरोबा मंदिरामध्ये दर्शनासाठी गेले होते. तेथे गर्दी असल्यामुळे त्यांचा धक्का एका व्यक्तीला लागला. याच कारणाचा राग धरून सचिन बाळासाहेब जपकर, सौरभ छबू जपकर, अभिजीत साहेबराव मोरे, सार्थक रभाजी जपकर आणि शुभम रभाजी जपकर (सर्व रा. रानमळा, नेप्ती) यांनी फिर्यादीला गाठले. तू आमच्या माणसाला धक्का का दिला? अशी विचारणा करत त्यांनी वाद घालण्यास सुरुवात केली. संकेत यांनी हा धक्का चुकून लागल्याचे सांगूनही आरोपींनी त्यांचे काहीही ऐकले नाही. आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी सौरभ जपकर याने संकेत यांना जमिनीवर पाडले, तर सचिन जपकर याने आपल्याकडील चॉपरने संकेत यांच्या तोंडावर वार करून त्यांना गंभीर जखमी केले. इतर आरोपींनी यावेळी त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. या मारहाणीत संकेत मोरे हा गंभीर जखमी झाल्यामुळे त्याच्यावर उपचार सुरु होते. प्रकृतीत सुधारणा झाल्यानंतर संकेत मोरे यांनी २७ एप्रिल रोजी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये पाचही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार खंडेराव शिंदे करत आहेत.

## पाईपलाईन रोडवर गॅस रिफिलिंग अड्ड्यावर छापा; एकास अटक

नगर – शहरातील पाईपलाईन रोड परिसरात घरगुती गॅस टाक्यांमधून चोरट्या पद्धतीने वाहनांमध्ये गॅस भरणाऱ्या अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकून एका आरोपीला अटक केली तर गॅस रिफिलिंगसाठी लागणारे साहित्य आणि गॅस टाक्या असा सुमारे १६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी जिल्ह्यात अवैध गॅस रिफिलिंग करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली सुनील पवार, गणेश धोत्रे, शाहिद शेख आणि महिला पोलीस अंमलदार सोनल भागवत यांच्या पथकाने शहरात शोधमोहीम सुरू केली होती.

२८ एप्रिल रोजी पेट्रोलींग करत असताना पाईपलाईन रोडवरील सोहम वॉशिंग सेंटरच्या बाजूला असलेल्या एका पत्र्याच्या शेडमध्ये बेकायदेशीररित्या गॅस रिफिलिंग सुरू असल्याची माहिती पथकाला मिळाली. पोलिसांनी सदर ठिकाणी छापा टाकला असता, सचिन अशोक भांड (वय ३६, रा. शिमला कॉलनी, भिस्तबाग रोड, सावेडी) हा इसम घरगुती वापराच्या गॅस टाकीतून वाहनामध्ये गॅस भरताना रंगेहात मिळून आला. या कारवाईत पोलिसांनी १० हजार रुपये किमतीची गॅस रिफिलिंगची इलेक्ट्रिक मोटार, पाईप, नोझल, एच.पी. कंपनीची घरगुती गॅस टाकी आणि वजनकाटा असा एकूण १६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. कोणत्याही प्रकारचा परवाना नसताना आणि सुरक्षेची कोणतीही काळजी न घेता, स्वतःच्या व इतरांच्या जीवितास धोका निर्माण होईल अशा पद्धतीने हा व्यवसाय सुरू होता. याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार गणेश शिवाजी धोत्रे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास तोफखाना पोलीस करीत आहेत.

## माझ्या जीवाचे बरेवाईट करीन अशी धमकी देत केला अल्पवयीन मुलीचा विनयभंग

नगर – माझे तुझ्यावर प्रेम आहे. तू मला भेटायला ये. भेटायला आली नाहीतर मी माझ्या जीवाचे बरेवाईट करुन घेईन, अशी भावनिक धमकी देत एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची घटना उघडकीस आली आहे. अहिल्यानगर तालुक्यातील पारगाव भातोडी येथे ही घटना घडली. तसेच याबाबत कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी आरोपीने दिली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी विजय एकनाथ सांगळे याला ताब्यात घेतले आहे.

याबाबत पीडितेने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, आरोपीने पीडित मुलगी अल्पवयीन असल्याचे माहीत असतानाही तिला भ्रमणध्वनीवरून संदेश पाठवून प्रेमाच्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न केला. मी तुझ्याशी लग्न करेन, तू जर मला भेटायला आली नाही तर मी माझ्या जीवाचे बरेवाईट करून घेईन, अशी भावनिक धमकी देऊन त्याने पीडितेला वारंवार स्वतःच्या घरी भेटीसाठी बोलावले. भेटीदरम्यान पीडितेने विरोध दर्शवलेला असतानाही आरोपीने तिच्याशी बळजबरीने जवळीक साधून विनयभंग केला. या सर्व प्रकाराबाबत जेव्हा पीडितेच्या आईने आरोपीला जाब विचारला आणि समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, तेव्हा आरोपीने त्यांना धक्काबुक्की केली. जर याबद्दल कोणाला काही सांगितले, तर तुला आणि तुझ्या कुटुंबाला जिवंत सोडणार नाही, अशी धमकीही त्याने दिली. त्यानंतर पीडितेने हिंमत एकवटून नगर तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दिली. नगर तालुका पोलिसांनी या प्रकरणी भारतीय न्याय संहिता आणि बालकांचे लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये (पॉक्सो) गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक पतंगे करत आहेत.

## सावेडीतील नंदनवन कॉलनीत घरातून चोरी; ऐवज लंपास

नगर – वाढदिवसाच्या कार्यक्रमासाठी पुण्यात गेलेल्या कुटुंबाचे सावेडी उपनगरातील पाईपलाईन रोडवरील नंदनवन कॉलनीत बंद घर फोडून अज्ञात चोरट्यांनी ८० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना २३ एप्रिल रोजी दुपारी २ वाजेनंतर ते २६ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजेदरम्यान घडली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी साहिल श्रीराम पवार यांनी फिर्याद दिली आहे. साहिल यांचे बंधू पुण्यात राहतात. भावाचा वाढदिवस असल्याने ते सर्व कुटुंबासह २३ एप्रिल रोजी दुपारी २ वाजता घर बंद करुन पुणे येथे कुटुंबासह गेले होते. त्यांचे घर बंद असल्याचे पाहून चोरट्यांनी मुख्य दरवाजाचा कडी–कोंडा तोडून आत प्रवेश केला. घरातील कपाटाचे लॉकर तोडून चोरट्यांनी ५ ग्रॅम व ७ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या दोन अंगठ्या, २५० ग्रॅम वजनाचे चांदीचे बिस्कीट असे सुमारे ५० रुपये किमतीचे दागिने आणि ३० हजार रुपयांची रोकड असा एकूण ८० हजार रुपयांचा माल चोरून नेला. शेजाऱ्यांनी पवार यांच्या घराचा दरवाजा उघडा असल्याचे पाहिल्यानंतर त्यांनी ही घटना पवार यांना कळविली. त्यानंतर पवार हे २६ एप्रिल रोजी पुण्यावरुन तातडीने घरी परत आले. त्यानंतर त्यांनी घरात पाहणी केली असता घरात चोरी झाल्याचे निर्दर्शनास आले. ही माहिती त्यांनी तोफखाना पोलिसांना कळविली. त्यानंतर तोफखाना पोलिसांचे पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी फिंगरप्रिंट तज्ञ आणि श्वान पथकाला पाचारण करून तपास केला. याप्रकरणी साहिल पवार यांच्या तक्रारीवरून तोफखाना पोलिसांनी गुन्हा नोंदवला असून पोलीस हवालदार गणेश साठे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

